सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, २५ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०१ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## तुळजाभवानी मंदिरातील दागिने वितळवण्याची मागणी हायकोर्टाने फेटाळली!

संभाजीनगर : श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या तिजोरीतील सोने आणि चांदी वितळवण्याची धाराशीव जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली मागणी मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने फेटाळली आहे. न्यायाधीश मंगेश पाटील आणि शैलेश ब्रह्मे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

सोने-चांदी वितळवण्याच्या शासकीय निर्णयाला हिंदु जनजागृती समितीने कडाडून विरोध केला होता. भक्तांच्या श्रद्धेचे रक्षण व्हावे आणि देवस्थानातील अपहार उघडकीस यावा यासाठी समितीने न्यायालयात याचिका दाखल केली होती, अशी माहिती समितीच्या वतीने न्यायालयीन लढा देणारे मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता उमेश भडगावंकर यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देतांना हिंदु विधीज्ञ परिषदेचे संस्थापक सदस्य आणि मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी म्हणाले की, तुळजापूर देवस्थानात वर्ष १९९१ ते २००९ या कालावधीत तत्कालीन विश्वस्त, सरकारनियुक्त अधिकारी, लोकप्रतिनिधी, ठेकेदार या सर्वांनी मिळून ८ कोटी ५० लाख रुपयांचा अपहार केला आहे. हा अपहार झाल्यानंतर प्रशासकीय स्तरावरून त्यांच्या विरोधात गुन्हा नोंद करणे किंवा आर्थिक वसुली करणे अशी कोणतीच कृती होत नव्हती. त्यामुळे या संदर्भात हिंदु जनजागृती समितीने





मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाकडे याचिका प्रविष्ट केली होती. या याचिकेत ८ ठेकेदार, ८ सरकारनियुक्त प्रशासक तथा जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी केली होती. त्यावर न्यायालयाने निर्णय देत ९ मे २०२४ या दिवशी या सर्वांच्या विरोधात फौजदारी गुन्हे नोंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर वर्ष २००९ ते २०२४ या कालावधीतील सोने, नाणी वितवळण्यास अनुमती मिळावी, असे याचिका धाराशीव जिल्हाधिकारी यांनी संभाजीनगर खंडपीठाकडे केला. ही अनुमती देण्यात येऊ नये यांसाठी हिंदु जनजागृती समितीने कडाडून विरोध केला होता.

वर्ष १९९१ ते २००९ या कालावधीत जो गैरव्यवहार-भ्रष्टाचार, अपहार झाला आहे तो उघड होऊ नये म्हणून, तसेच त्याचा अपहार करता यावा म्हणूनच हे सोने वितळण्याची अनुमती मागण्यात आल्याची दाट शंका आहे, असे म्हणणे समितीने याचिकेत मांडले होते. याचसमवेत संभाजीनगर खंडपीठाने अपहाराच्या संदर्भात गुन्हे नोंद करण्याच्या दिलेल्या आदेशाच्या विरोधात सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले असून ती सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे धाराशीवच्या जिल्हाधिकार्यांचा सोने वितवण्याचा अर्ज संमत करण्यात येऊ नये, अशी मागणी अधिवक्ता सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी समितीच्या वतीने केली होती.

समितीच्या प्रयत्नांमुळे भक्तांच्या श्रद्धेचे रक्षण

''हिंदु जनजागृती समितीने भक्तांच्या श्रद्धेचे रक्षण केले आहे. हा विजय म्हणजे न्यायव्यवस्थेवरील भक्तांचा विश्वास अधिक दृढ करणारा आहे. समितीच्या प्रयत्नांमुळे देवस्थानातील अपहार आणि भ्रष्टाचार रोखण्यास हातभार लागला आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या संपत्तीचे रक्षण आणि अपहार करणार्यांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी आम्ही न्यायालयीन लढा सुरूच ठेवू, असे समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक सुनील घनवट यांनी सांगितले.

## सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात पेपरलेस मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

मुंबई : राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासननिर्णय काढण्यात आला आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही.

## आणंदमध्ये १०७ किलो ड्रग्ज जप्त

### छापेमारीत ५ जणांना करण्यात आली अटक

आणंद : गुजरात पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) आणंद जिल्ह्यातील खंभाट भागात मोठी कारवाई केली. यावेळी १०७ किलो अल्प्राझोलम पावडर जप्त करण्यात आले. तसेच ५ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) आनंद जिल्ह्यात अल्प्राझोलम नावाच्या पदार्थाची निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर छापा टाकला. यावेळी एटीएसने १०७ कोटी रुपये किंमतीच्या प्रतिबंधीत ड्रग्जसह ५ जणांना अटक केली आहे. अल्प्राझोलमचा नशेसाठी गैरवापर केला जात असल्याने ते नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायद्याच्या कक्षेत येते. सेंट्रल ब्युरो ऑफ नार्कोटिक्सकडून (सीबीएन) अल्प्राझोलम उत्पादनासाठी परवाना दिला जातो. दरम्यान, एटीएसच्या छाप्यादरम्यान संशयित आरोपींकडे परवाना मागितला असता, त्यांच्याकडे तो नव्हता. यावेळी पाच जण युनिट चालवत होते, तर सहावा व्यक्ती रिसीव्हर होता. प्राथमिक तपासात असे आढळून आले आहे की पाचही आरोपींनी सायकोट्रॉपिक पदार्थ तयार करण्यासाठी कारखाना भाड्याने घेतला होता. दरम्यान गुजरातचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी सांगितले की, एटीएसने ५ जणांना अटक केली आहे. या कारवाईत झोपेच्या गोळ्या बनवण्यासाठी वापरली जाणारी १०७ किलोपेक्षा जास्त पावडर जप्त केल्याचे त्यांनी सांगितले.

## एमजीएमच्या खेळाडूंचे राष्ट्रीय पातळीवर यश

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या खेळाडूंनी विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेत यशस्वी कामगिरी केलेली आहे. या स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना आज विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आज सन्मानित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये विश्वजीत कुलकर्णी (तलवारबाजी), ऋषभ जाधव (तलवारबाजी), शुभम सरकटे (जिम्नॅस्टिक), साक्षी डोंगरे (जिम्नॅस्टिक) आणि मोहिनी कातुरे (पिस्टल शूटिंग) आदि विद्यार्थ्यांचा समावेश होता.

यावेळी, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई,स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका डॉ. परमिंदर कौर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. दिनेश वंजारे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत केलेल्या यशस्वी कामगिरीची माहिती खालीलप्रमाणे आहे :

१. विश्वजीत कुलकर्णी : नुकत्याच युनिव्हर्सिटी ऑफ जम्मू येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विश्वजीत कुलकर्णी याची 'खेलो इंडिया आंतर विद्यापीठ' क्रीडा स्पर्धेसाठी निवड



झाली आहे. तसेच त्याने नांदेड येथे झालेल्या राज्य वरिष्ठ गट तलवारबाजी स्पर्धेमध्ये फॉइल सांघिक प्रकारामध्ये रौप्य पदक पटकावले आहे.

२. ऋषभ जाधव : ऋषभने केरळ येथे संपन्न झालेल्या वरिष्ठ गट राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये सांघिक प्रकारामध्ये आठवे स्थान संपादन केले होते. त्याचप्रमाणे नांदेड येथे झालेल्या ३५ व्या राज्य वरिष्ठ गट तलवारबाजी स्पर्धेमध्ये इप्पी वैयक्तिक प्रकारामध्ये कांस्यपदक पटकावले आहे. डेहराडून, उत्तराखंड येथे फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

३. शुभम सरकटे : शुभम याने सुरत, गुजरात येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय वरिष्ठ गट जिम्नॅस्टिक स्पर्धेमध्ये दोन सुवर्ण तर एक रौप्यपदक पटकावले आहे.

४. साक्षी डोंगरे : साक्षी हिने राष्ट्रीय वरिष्ठ गट जिम्नॅस्टिक स्पर्धेमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहे. तसेच डेहराडून, उत्तराखंड येथे फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

५. मोहिनी कातुरे : मोहिने हिने दिल्ली येथे डिसेंबर महिन्यात संपन्न झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत दोन पदके जिंकली होती. ५० मीटर पिस्तूल या प्रकारात कनिष्ठ महिला सिव्हिलियन सांघिक गटात सुवर्णपदक व कनिष्ठ महिला सांघिक गटात कांस्य पदक तिने जिंकले आहे. तसेच तिने नुकत्याच पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेत ५० मीटर फ्री पिस्टल प्रकारात वरिष्ठ महिला गटात वैयक्तिक कांस्यपदक व कनिष्ठ महिला गटात वैयक्तिक रौप्यपदक पटकावले आहे.

या सर्व विजेत्या खेळाडूंचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, क्रीडा विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे, डॉ.शशिकांत सिंग, डॉ.सदाशिव जव्हेरी,डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, रहीम खान, प्रवीण शिंदे, निलेश खरे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## गोठे बांधले पण शासन अनुदान देत नसल्याने शेतकरी हवालदिल!

रायगड : शासन आपल्या दारी योजनेच्या कार्यक्रमात राज्याच्या महिला बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते फेब्रुवारी २०२३ मध्ये महागाव ग्रामपंचायत हद्दीतील १० लाभार्थी शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जनावरांच्या गोठ्यांचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी देऊन काम सुरू करण्यास मान्यता देण्याचे पत्र देण्यात आले परंतु लाभार्थी शेतकरी यांनी गोठे बांधून आज ११ महिने होऊन गेले तरी पूर्ण अनुदान त्यांच्या पदरात अजून पडलेले नाही. पंचायत समिती कार्यालयात हेलपाटे मारून शेतकरी मात्र बेजार झाला आहे गोठा बांधण्यासाठी लागणारे पत्रे, सिमेंट, रेती, विटा हे सर्व उसनवारी करून गोठे बांधले आणि आता शासन अनुदान देत नाही आहे. तळा पंचायत समितीकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १० शेतकऱ्यांना जनावरांचे गोठे मंजूर करण्यात आले आहेत.

## २६ जानेवारीला संत ज्ञानेश्वर उद्यान उघडण्याच्या हालचाली

तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- पर्यटकांसाठी प्रसिद्ध संत ज्ञानेश्वर उद्यान सुरू होण्याच्या तारखेचा गौडबंगाल सुरू असतांना आता २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी हे उद्यान उघडण्यासाठी जायकवाडी पाटबंधारे विभाग सरसावले आहे. कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांनी उद्यानात सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत आम्ही २६ जानेवारी रोजी उद्यान सुरू करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगितले यावेळी उपविभागीय अभियंता



दीपक डोंगरे, शाखा अभियंता तुषार विसपुते यांची उपस्थिती होती.

छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर उद्यानाला भरपूर निधी मिळाला असून २६ जानेवारी रोजी हे उद्यान जनतेसाठी उघडण्याच्या हालचालींना वेग आला आहे.यादिवशी पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,अधीक्षक अभियंता समाधान सबनीसवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यासाठी उद्यानातील संगीत कारंजे, वृक्ष लागवड, फ्लॉवर गार्डन डेव्हलप,मॅट आणि ईतर कामे अंतिम टप्प्यात आहेत. उद्यान सुरू झाल्यास पैठणच्या बाजारापेठेला मोठी चालना मिळणार आहे.

## उत्तरकाशीत भूकंपाचे ३ धक्के!

डेहराडून : उत्तराखंडच्या उत्तरकाशीमध्ये आज, शुक्रवारी सकाळी भूकंपाचे तीन धक्के बसले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ३.५ इतकी मोजण्यात आली. हा भूकंप भूगर्भात ५ किलोमीटर खोलीवर झाल्याचे राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सांगितले.

उत्तरकाशीला आज सकाळी भूकंपाचे तीन धक्के जाणवले. यामुळे लोक घाबरून घराबाहेर आले. या भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली. त्याचे केंद्र उत्तरकाशीत होते. भूकंपाचे धक्के सौम्य स्वरुपाचे होते. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने लोकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, उत्तरकाशीत सकाळी ७.४१ वाजता भूकंपाचा पहिला धक्का जाणवला. यानंतर आणखी एक धक्का बसला. तर सकाळी ८ वाजून १९ मिनीटांनी भूकंपाचा तिसरा धक्का बसला. सलग बसलेल्या या भूकंपांच्या धक्क्यामुळे लोक घराबाहेर पडले.

## शुद्ध पाणी प्रकल्पाची नोंदच नाही; पाणी गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.२३ जानेवारी - शहरास नगर पालिकेकडून होणाऱ्या पाण्याची गुणवत्ता अत्यंत खराब झालेली आहे, शहरातील नागरीकांना पिण्यायोग्य शुद्ध पाणी पुरवठा होत नसल्याने त्यांना पिण्याच्या पाण्याचे जार विकत घ्यावे लागते. यामुळे जारच्या पाण्याच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, यामुळे जार व्यवसायिकांना मोठा फायदा होत आहे.

> **माझ्याकडे अतिरिक्त पदभार आहे. नगर परिषद च्या रेकॉर्ड नुसार फक्त एकच परवानगी घेतलेली आहे. बाकी शहरात किती आहेत याची माहिती नाही.**
> **गणेश अधोरे पाणी पुरवठा निरीक्षक नगर परिषद**

कन्नड शहरात सुमारे ३२ शुद्ध पाणी प्रकल्प (आर. ओ. प्लान्ट) आहे . प्रशासनाच्या दप्तरी मात्र एकाच आर. ओ. प्लान्टची नोंद आहे. उर्वरीत ३१ आर. ओ.प्लांट धारक अनधिकृतपणे हा व्यवसाय

> **दूषित पाणी पिल्याने शरीरावर खूप मोठे दुष्परिणाम होतात हाडे ढिसुळ होतात, दात कमजोर होतात, गॅस्ट्रो, कावीळ, सांधेवात, मलेरिया सारखे आजार उद्भवतात**
> **डॉ प्रदीप कांबळे हाडांचे तज्ञ**

करीत असल्याचे दिसून येत आहे. शहराला नगर परिषदेकडून साधारणत: आठ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जातो. पाण्याची गुणवत्ता अत्यंत खराब झालेली आहे, कन्नड नगरपरिषद शहर वासीयांच्या जिवाशी खेळत

> **महाराष्ट्र नगर परिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ नुसार या कायद्याअंतर्गत ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.**

आहे, शहरास होत असलेल्या पाण्याचे शुद्धीकरण सुद्धा करत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी या जारच्या पाण्याशिवाय शहरवासियांना पर्याय नसल्याचे दिसून येत आहे. या जारच्या पाण्यासाठी दर तिन महिन्याला पाणी गुणवत्ता चाचणी आवश्यक असताना बहुतांश आर.ओ. जारचे पाणी विना परवाना विकले जात आहे.अन्न व औषध प्रशासन विभागाकडून किंवा स्थानिक नगर परिषदे कडून पाणी गुणवत्ता तपासणी होत नाही व यावर कुणाचेही नियंत्रण दिसून येत नाही. यामुळे सर्व सामान्य शहरवासियांच्या जिवांशी खेळच झाला आहे. या आर. ओ. प्रकल्पातून तयार होणाऱ्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी व अनधिकृत व्यावसायिकांचा शोध घेणे गरजेचे आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२४ जानेवारी - सोलापूर धुळे महामार्गावरील पाणपोई फाटा उड्डाण पुलाच्या सर्व्हिस रोडवर हतनूर येथून शुक्रवारी दि.२४ रोजी सकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास कन्नडकच्या दिशेने जाणाऱ्या भागीनाथ जाधव (वय ५९) या दुचाकीस्वाराचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. स्थानिक नागरीकांच्या मदतीने त्यांना पुढील उपचारासाठी कन्नड्च्या ग्रामीण रुग्णालयात हलवले असता वैद्यकिय अधिकारी अनिरुद्ध गायकवाड यांनी तपासून मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.कन्नड शहर पोलिस ठान्यात अज्ञात वाहना विरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.









सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेख हसीना : प्रत्यार्पण

इ.स.१९५४ ते १९५८ हा काळ पाकिस्तानच्या राजकीय पटलावर अशांती, गडबड, अस्थिरतेचा कालखंड होता. पंतप्रधान आले आणि गेले. घटना तयार झाली पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. १९५८ मध्ये कमांडर इन चीफ अयुबखानने पाकिस्तानात मार्शल लॉ लागू केला, इथूनच पंजाब प्रांताचे वर्चस्व सर्व क्षेत्रात वाढण्यास सुरवात झाली. अयुबखानने आपल्या कारर्किदीत कराचीहून राजधानी इस्लामाबादेत नेली. विरोधकांचे दमन करण्यात येवू लागले. दरम्यान १९६५ मध्ये भारत-पाक युद्ध सुरू झाले. उभय देशातील संबंध खुप बिघडले. भारत पाकिस्तान दरम्यान दळणवळणाच्या साधनांवर बंदी आली. पाकिस्तानात पंजाबी लोकांचे वर्चस्व वाढू लागले.

शेख मुजीबुर्रहमान, मौलाना भाषांनी इत्यादी नेत्यांनी स्वतंत्र बांगला देशासाठी संघर्ष सुरु केला. पाकिस्तानात अयुबखान विरोधी लाट उसळून आली. मुजीबुर्रहमानच्या 'शोनार बंगला'च्या वादळात थोपविण्यासाठी सैन्य बळाचा वापर झाला. बांगलादेशवासीयांवर गोळ्यांचा वर्षाव झाला. पाकिस्तानी सेनेच्या पाशवी अत्याचाराला घाबरून लाखो बंगाली भारतात घुसखोरी करु लागले. नाईलाजास्त १६ डिसेंबर १९७१ मध्ये भारताला पूर्व पाकिस्तानात फौज पाठवावी लागली. परिणामत: ९० हजार पाकिस्तान्यांनी भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली.

१९७१ मध्ये बांगलादेशच्या स्वातंत्र्य युद्धात भारताने दिलेले योगदान आजही जगाला स्मरणीय आहे. हा संघर्ष केवळ ऐतिहासिकच नाही तर तो दक्षिण आशियाच्या भू-राजकीय समीकरणावर प्रभाव टाकणारा होता. भारत आणि बांगला देशचे संबंध ऐतिहासिकदृष्टया जवळचे आहेत. १९७१ च्या युद्धा दरम्यान भारताने निर्वासितांना आश्रय दिला आणि बांगलादेशच्या स्वातंत्र्य लढयाला महत्वपूर्ण मदत केली. या काळात भारताने केलेली मदत ही राजकीय नव्हती, तर ती मानवीय दृष्टिकोनातून देखील होती. जवळपास दहा लाख निर्वासितांना आश्रय देणे आणि सैनिकी मदत पुरवणे हे त्यावेळच्या भारतीय धोरणाचे मुख्य वैशिष्टये होते. या ऐतिहासिक घटनेमुळे बांगलादेशच्या राजकारणात भारताला एक महत्वपूर्ण स्थान मिळाले आहे.

५ ऑगस्ट २०२४ ला बांगलादेशात शेख हसीना यांच्या राजवटीविरुद्ध एक झंझावात ऊठले ज्यात बांगलादेशीय नागरिकांच्या जीवित व वित्ताची शाश्वती उरली नव्हती. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने हिंसक वळण घेतले आणि दीर्घकाळ बांगला देशच्या पंतप्रधान पदी कार्यरत असलेल्या ७७ वर्षीय शेख हसीना यांना बांगलादेश सोडणे अनिवार्य झाले. 'ईकमते दीन' ची दिवा स्वप्ने रंगवणा-या लोकांना अंर्तमुख करणारी घटना घडली. जगातील बहुसंख्य मुस्लिम देशात न जाता शेख हसीना संरक्षण घेण्यासाठी भारतात आश्रय घेण्यासाठी आल्या. खेदाने नमूद करावे वाटते स्वर्गाहून सुंदर असलेल्या या भारत भूमित येथील मुस्लिमांना सर्व हक्क, अधिकार असूनही काही लोकांना भारतभूमि असुरक्षित वाटते. या उलट शेख हसीना यांनी जगातील कुठल्याच मुस्लिम राष्ट्रावर विश्वास न दर्शवता आपल्या जिवीत सुरक्षिततेे साठी भारत भूमि सुरक्षित समजतात याचा अन्वयार्थ भारत विरोधी व मोदी विरोधी भूमिका घेणा-या मुस्लिमांना लावता आला तर बरं होईल. शेख हसिना यांना भारतात आश्रय दिल्यानंतर भारत आणि बांगला देशातील संबंधात तणाव निर्माण झालेला आहे.

शेख हसीना यांच्यावर मानवाधिकार उल्लंघनाचे गंभीर आरोप आहेत. बांगलादेश सरकार ने त्यांच्या प्रत्यार्पणासाठी भारताकडे औपचारिक विनंती केली आहे. शेख हसीना यांच्यावर असलेल्या आरोपांमध्ये जनसंहार विरोधकांवर अत्याचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा समावेश आहे. बांगला देशाच्या मागणीवर विचार करण्यापूर्वी काही महत्वाचे घटक ही आपल्या लक्षात घेणे महत्वाचे आहे. भारताचे संविधान प्रत्येक व्यक्तिला त्यांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण देते. त्यामुळेच या मुद्यांवर सरकार संतुलित भूमिका घेतांना दिसते. डिसेंबर महिन्यात भारताचे विदेश सचिव विक्रम मिस्त्री यांनी त्यांच्या बांगलादेशाच्या दौ-या दरम्यान हा संदेश दिला की, भारत एक मित्र आहे, व्यापार, उर्जा, मूलभूत आराखडा आणि कनेक्टिटी च्या क्षेत्रात सातत्य असण्याच्या मुदयांना पुष्टि देत त्यांची आवश्यकता आजच्या परिस्थितीत किती महत्वपूर्ण आहे हे पटवून दिले व त्यात ते यशस्वी ही झाले. दोन्ही देशांच्या सीमेवरील स्थिती शांत ठेवण्यात ही सफल ठरले. भारत सरकारने एक संसदीय समिती गठीत करून हे संकेत दिले की, हसीना भारतात या पाहुण्या म्हणून दिल्लीत आहेत. बांगला देशाचे यूनुस यांना लक्ष्य करून त्यांच्यावर राजकीय टीका किंवा संदेश जर हसीना देत असतील तर ते हसीना यांचे वैयक्तिक मत असेल त्याचा भारताशी कुठलाही संबंध असणार नाही. परंतु एक आठवडयापूर्वी परिस्थिती बदल झाले आहे. बांगला देशाने भारत सरकारला एक नोट वर्बल' जारी केले आहे. ज्यात लिहले असहे की शेख हसीना यांच्यावर भ्रष्टाचार, प्रदर्शनकारी विद्यार्थ्यांवर करण्यात आलेली पोलीस कार्यवाई, मानवतेच्या विरोधात केलेला अपराध इत्यादी आरोप त्यांच्यावर लावण्यात आलेले असून त्यांची चौकशी करण्यासाठी भारत सरकारने २०१३ च्या भारत-बांगला देश प्रत्यार्पण संधी नुसार व २०१६ मध्ये संशोधित केलेल्या नियमानुसार शेख हसीना यांना बांगला देश सरकारकडे, प्रत्यारर्पीत करावे. प्रथम एक गोष्ट निश्चित करावी लागेल की शेख हसीना यांचे प्रत्यार्पण हे उभय देशांच्या दीर्घ वार्तालापातुनच शक्य होईल. युनुस सरकारला प्रथम हे लक्षात घ्यावे लागेल की, शेख हसीना आणि त्यांच्या कुटुंबियाचे भारताबरोबर संबंध कसे आहेत ? बांगला देशाच्या मुक्तिचा इतिहास दोन्ही देशांच्या बलिदानांचा इतिहास आहे. १९७५ मध्ये हसीनांचे वडील शेख मुजिबुर रहमान व त्यांच्या परिवार जनांची हत्या तदनंतर त्यांनी भारतात निर्वासन भारत -बांगला संबंधना दृढ केलेले आहे. त्यामुळे युनुस सरकारने हे समजून घ्यावे की, भारत सरकार सहजपणे शेख हसीना यांना बांगला देशाला सुर्पूद करणार नाही. विशेषत्वाने जेव्हा हसीना यांनी भारत सरकारकडे स्वत: शरण मागितले आहे. अशा स्थितीत भारतावर त्यांच्या प्रत्यार्पणासाठी कुठलाही दबाव चालू शकत नाही.

भारत सरकारने १९९५ मध्ये दलाई कामा यांना भारतात शरण देण्याचा निर्णय घेतला होता. भारताच्या या निर्णयामुळे चीनचा जळफळाट झाला होता व चीनने भारतातवर खूप दबाव आणला होता पण चीनच्या दबावला भारताने गुमानले नाही व दलाई लामाचे प्रत्यार्पण केले नाही. शेख हसीना यांचे प्रत्यार्पणाचे प्रकरण दोन देशांच्या संबंधावरच अवलंबून नसून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या प्रतिमेवर देखील होवू शकतात या साठी काही उपाय योजना करणे गरजेचे आहे. बांगलादेश सरकारने शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासाठी भारताकडे विनंती केलेली आहे.

भारत आणि बांगला देश यांच्यातील आर्थिक संबंध मजबुत असून दोन्ही देशांना याचा लाभ होत असतो. भारतीय बाजार पेठेत बांगला देशच्या वस्त्र उद्योगाला मोठी मागणी आहे. बांगला देशचा वस्त्र उद्योग हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून भारत हा त्यांचा प्रमुख भागीदार आहे. याशिवाय दोन्ही देशामध्ये पायाभूत सुविधा प्रकल्प, उर्जा क्षेत्रातील सहकार्य, पर्यटन क्षेत्रात प्रचंड गुंतणूक आहे. या आर्थिक संबंधांना बळकटी देणे, द्विपक्षीय व्यापाराच्या सुधारणासाठी धोरणात्मक पावले उचलणे ही गरजेचे आहे. सध्याच्या तणावाचा परिणाम आर्थिक संबंधावर होवू नये याची दक्षता घेणे महत्वाचे आहे. त्यासाठी काही महत्वाचे उपाययोना करणे गरजेचे आहे.

१) न्यायिक प्रक्रिया सुलभ करणे : शेख हासीना यांच्या खटल्यासाठी व्हिडियो कॉन्फरसिंग द्वारे सुनावणी घेणे हा एक मार्ग असू शकतो. यामुळे बांगला देशला त्यांचे न्यायालयीन अधिकार बजावण्याची संधी मिळेल व भारताच्या मानवतावादी दृष्टिकोनाला देखील बाधा येणार नाही. २) संवादाचे माध्यम खुले ठेवणे : बांगलादेशाच्या तपास यंत्रणांना भारतात पुरावं गोळा करण्याची परवानगी देणे या मुळे दोन्ही देशात परस्परांविषयी विश्वास वाढविण्यास मदत मिळेल. ३) सीमा व्यवस्थापन सुधारणा : उभय देशांनी एकत्र येवून सीमेवरील स्थालांतरितांची समस्या सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना करून यात तंत्रज्ञानाचा वापर , सामायिक पायाभूत सुविधा आणि स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मिती यांचा समावेश करावा लागेल. ४) मानवाधिकारांचे रक्षण : शेख हसीना यांना त्यांच्या अधिकारांचे संरक्षण देत मानवतावादी दृष्टिकोण भारत सरकारला स्वीकारावे लागेल, त्यासाठी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संघटनांच्या शिफारसींचा विचार ही भारताने योग्य भूमिका स्वीकारली पाहिजे.

शेख हसीना यांच्या सरकारने भारताच्या कूट नीतीसाठी विविध महत्वाची पावले उचलली आहेत, पण त्यांचे प्रत्यार्पण (एक्झेडिशन) संबंधीचे निर्णय हे मोठे कूटनीतिक आव्हान ठरू शकतात. प्रत्यार्पण म्हणजे एका देशाने दुस-या देशाच्या मागणीवर आरोपी व्यक्तीला न्यायलयीन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी त्याच्या देशात पाठविणे, भारताच्या दृष्टिकोनातून या प्रक्रियेत बांगलादेशच्या सरकारच्या सहमतीची आवश्यकता आहे, परंतु बांगलादेश सरकार शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासाठी भारतावर दबाव आणणर हे नक्कीच आहे. प्रत्यार्पण सारख्या संवेदनशील मुद्यांवर दोन्ही देशाच्या सार्वभौम अधिकारांचा आदर करत एक उत्तम 'मध्यस्थी' भूमिका स्वीकारणे गरजेचे ठरेल.

भारताने बांगला देशासाठी योग्य कूटनीतिक मार्ग निवडला तर त्याचे आंतराष्ट्रीय स्तरावर सकारात्मक परिणाम होवू शकतात. विशेषत: भारताच्या प्रभावशाली परराष्ट्र धोरणात, दक्षिण आशियात त्याच्या भूमिका आणि प्रतिष्ठेला बळकटी मिळू शकते. प्रत्यार्पण सारख्या संवेदनशील मुद्यावर, मतभेद निर्माण होवू शकतात. भारताने त्याच्या कुटनीतिला संतुलीत ठेवून शेख हसीना यांचे नेतृत्व हित संबंधाच्या दृष्टिकोनातून अधिक मजबूत केले पाहिजे.

- डॉ. तसनिम पटेल
छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. आइ. आवटी मॅडम, सह दिवानी न्यायाधिश क.स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्रमांकः ४०९/२०२४ पु. तारीख : ११/०२/२०२५

अर्जदार : १- जयश्री भ्र. रमेश पाटील, वय-४७, धंदा- घरकाम, २-अनिकेत पि. रमेश पाटील, वय-२७, धंदा- नौकरी, ३-ऋषिकेश पि. रमेश पाटील, वय-२३, धंदा-शिक्षण, वरील सर्व रा. छाजेड नगर, कनकावती नगर कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर जि. छ. संभाजीनगर

अर्ज : वारसाहक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत.

तमाम जणतेस सुचित करण्यात येते की, ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार २ ते ३ यांचे वडील नामे रमेश साहेबराव पाटील हे दिनांक २८/१०/२०२२ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांचा अंत्यविधी मौजे कन्नड येथे करण्यात आला आहे. अर्जा सोबत नगर पालीका कन्नड यांचे कडील मयताचे प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. व मयतास अर्जदारा व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे.

ज्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २९/०१/२०२५ रोजी माझे सही निशी व मा न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक २३/१/२०२५

आदेशावरुन

लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मेव्ही. डी. पाटील साहेब) क. स्तर यांचे कोर्टात**

दि.किरकोळ अर्ज क. ५८/२०२५

अर्जदार : १. श्री.दिलीप पि. शिवाजी कुमावत वय-५० धंदा- शेती रा. हरसवाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. शिंगटेनगर, हिरपुर रोड चाळीसगांव ता.चाळीसगांव जि. जळगांव २. श्री. घनशाम पि.शिवाजी कुमावत वय-४८ धंदा- शेती रा. हरसवाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १. व २ यांची आई मयत नामे लक्ष्मीबाई भ्र. शिवाजी कुमावत यांचा मृत्यु दि. १८/१०/२०२४ रोजी मौजे हरसवाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून अर्जदारांचे वडील शिवाजी पि. आनंदा कुमावत हे देखील दि. १९/०८/१९९७ रोजी मयत झालेले आसुन मयतास केवळ अर्जदार क. १ व २ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदाराव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत लक्ष्मीबाई भ्र.शिवाजी कुमावत यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत लक्ष्मीबाई भ्र. शिवाजी कुमावत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि.२४/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. वी.डी. पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. क्रि. अर्ज. क्र. १९८/२०२४.

पुढील तारीख २८/०२/२०२५.

अर्जदार : १. शेख गुलजानबी शब्बीर, वय ७२ वर्षे, धंदा रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. घरकाम, २. शेख जाकेर शेख शब्बीर, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. नुरजान भिकन पठाण, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरगाव ता. फुलंब्री जि. औरंगाबाद ४. जरीना मोहम्मद पठाण, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाचणवेळ ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. इरफाना अफजल पठाण, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. झोपड़पट्टी पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ही मयत शब्बीर वजीर शेख यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ हे मुलगा आहे व तसेच अर्जदार क्रं. ३ ते ५ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्रं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत शब्बीर वजीर शेख यांचे कायदेशीर वारस आहे. हे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे मयत शब्बीर वजीर शेख हे दि.०३/१२/२०११ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत शब्बीर वजीर शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे व त्यांचे मयत वडील नामे मयत शब्बीर वजीर शेख हे मौजे पळशी बु ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते पळशी बु ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि. २६/०८/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनादवारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २७/०१/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.व्ही.डि.पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. १०/२०२५

अर्जदार : १) मुजीब खान मजीद खान पठाण वय-४५ वर्षे धंदा-शेती व व्यापार रा.खों साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २) मेहरूनिस्सा मसूद खॉ वय-४८ वर्षे धंदा-घरकाम रा.बाजार रोड माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) जहारा बेगम सय्यद अख्तर अली वय-४२वर्षे धंदा-घरकाम रा.प्रिया दर्शनी कॉलनी पडेगाव ता.जि. औरंगाबाद. ४) मसरत बेगम शेख मुस्तकिम वय-३९ वर्षे धंदा-घरकाम रा.काझी मोहल्ला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५) आसिया बेगम अक्रम खा पठाण वय - ५२वर्षे धंदा-घरकाम रा.खॉ साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६) पठाण अमीरखान अकमखान वय-३४ वर्षे धंदा-शेती राखॉ साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि.औरंगाबाद ७) मिसबा कौसर अब्दुल शाकेर शेख वय-२८ वर्षे धंदा-घरकाम रा.हर्सुल जटवाडा रोड औरंगाबाद. ता. जि. औरंगाबाद. ८) शाहेदा बेगम आजम खान वय-५०वर्षे धंदा-घरकाम रा.खिडकी का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ९) अफझल आझम खान वय-३०वर्षे धंदा-मजुरी रा.खॉ साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. १०) फाईजा आजम खान पठाण वय-२९वर्षे धंदा-घरकाम रा. खिडकी का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ११) आदीबा कौसर आजम खान वय-२५ वर्षे धंदा-घरकाम रा.खाँ साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. १२) फिरदोस आजम खान वय-२३वर्षे धंदा-घरकाम रा.खॉ साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. १३) खान नेहा आजम वय-१६वर्षे धंदा-शिक्षण रा.खाँ साहाब का बंगला कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : १) महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार के १ ते ४ यांचे वडील व अर्जदार कं ५ व ८ यांचे सासरे तसेच अर्जदार कं. ६ ते ७ व अर्जदार कं. ९ ते १३ यांचे आजोबा नामे - मजीद खॉ दिलावर खॉ हे होते ते कन्नड येथील रहिवाशी होते ते दिनांक -१०/०३/१९९६ रोजी मयत झाले आहे त्यांची पत्नी नामे जायदा बेगम मजीद खों या होत्या त्या देखील दिनांक २६/०९/२०२० रोजी कन्नड येथे मयत झालेल्या आहेत तसेच अर्जदार कं. ५ यांचे पती व ६ ते ७ यांचे वडील व अर्जदार कं. १ ते ४ यांचा भाउ नामे मयत अक्रम खों मजिद खॉ पठाण हे दिनांक -२७/१२/२०२३ रोजी कन्नड येथे मयत झाले आहे तसेच अर्जदार कं ८ चे पती व अर्जदार कं.९ ते १३ यांचे वडील व अर्जदार कं. १ ते ४ यांचा भाउ नामे - आजम खाँ मजिद खॉ हे होते हे दिनांक-११/०९/२००९ रोजी कन्नड येथे मयत झाले आहे तसेच अर्जदार कं. १ ते ४ यांची बहिण व अर्जदार कं. ६ व ८ यांची ननद व अर्जदार कं ६ ते ७ व अर्जदार कं. ९ ते १३ यांची आत्या नामे - अविवाहीत मयत अंजुम आरा मजिद खॉ हया दिनांक २४/०८/२०१२ रोजी कन्नड येथे मयत झाले आहे मयत मजीद खॉ दिलावर खॉ म्हणजेच अर्जदार कं. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार कं. ५ व ८ यांचे सासरे व अर्जदार कं. ६ ते ७ यांचे आजोबा यांना मौजे कन्नड, वडनेर, कानडगाव कन्नड, ई. ठिकाणी त्यांची मिळकत आहे. मयत मजीद खॉ दिलावर खाँ यांचे अर्जदार कं. १ ते १३ हे कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त मयत मजीद खॉ दिलावर खों व मयत जायदा बेगम मजीद खा यांना ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार कं. १ ते १३ यांच्या नावाने महसुल दप्तरी, शासकिय निमशासकिय कार्यालयात नोंद होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबात कोणासही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार यांचे हक्कात अर्जदार कं. १ ते १३ हे मयत मजीद खॉ दिलावर खॉ यांचे वारस असल्याचे अर्जदार कं. १ व १३ यांना वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक - ०९/०१/२०२५

आदेशावरून

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ३ रे सह दिवाणी न्यायालय, क, स्तर, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०२५

पुढील तारीख १८/०२/२०२५

अर्जदार : १. नाजुका भ्र. रवि अमोलिक, वय ३२ वर्षे, धंदा-घरकाम, रा.भोकर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर, २. वय २७ वर्षे, धंदा शेती, वैभव पि. बबन तुपे, रा. अघुर, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. एस. पी. लबडे यांचे मार्फत बॉम्बे रेग्यलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, छबु भावराव तुपे व द्रोपदाबाई छबु तुपे हे आपसात नात्याने पती पत्नी असून त्यापैकी छबु भावराव तुपे हे दिनांक २३/११/२०१९ रोजी मौजे भेंडाळा, ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे व त्यांची पत्नी द्रोपदाबाई छबु तुपे हया दिनांक २८/०८/२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत छबु भावराव तुपे व मयत द्रोपदाबाई छबु तुपे यांना दोन मुले नामे १. बबन छबु तुपे व राजु छबु तुपे असे होते, त्यापैकी राजू छबू तुपे हे दिनांक ०३/१२/२००८ रोजी मयत झाले असून मृत्यू समयी राजू छबु तुपे अविवाहीत होते व बबन छबु तुपे हे दिनांक १४/०४/२००५ रोजी मयत झालेले आहेत. मयत बबत छबु तुपे यांनी पत्नी सुनीता बबन तुपे हया देखील दिनांक २३/०७/१९९४ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत बबन छबु तुपे व मयत सुनिता बबन तुपे यांना दोन मुले नामे सुनिल बबन तुपे व अर्जदार क्र.२ वैभव बबन तुपे आणि एक मुलगी अर्जदार क्र.०१ नाजुका रवि अमोलिक असे आहेत. यापैकी सुनिल बबन तुपे हा दिनांक २६/०७/२०२२ रोजी अविवाहीत मयत झालेला आहे. येणेप्रमाणे मयत छबु भावराव तुपे व मयत द्रोपदाबाई छबु तुपे यांना अर्जदार क्र.०१ ही नात व अर्जदार क्र.०२ हा नातु असे कायदेशीर वारसदार असून, त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी बॉम्बे रेग्यलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणेबाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधिज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावी मुद्दतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अगिणी केले प्रसाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता जाहिर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 46/2025

अर्जदार : १. जिजाबाई कडुबा दापके, रा. कसाबखेडा, ता.खुल्ताबाद, जि. औरंगाबाद २. शोभाबाई शेषराव गवळी, रा. गवळीशिवरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३. अनिल कचरु जाधव, रा. शिल्लेगाव, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ४. सुनिल कचरु जाधव. रा.शिल्लेगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ ते ४ यांचे पिता नामे कचरु एकनाथ जाधव यांचा दि. २८/०७/२०२४ रोजी मौजे शिल्लेगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत कचरु एकनाथ जाधव यांची पत्नी आणि अर्जदार नं. १ ते ४ यांची आई नामे चंद्रकलाबाई कचरु जाधव हि दि. २३/०७/२०१४ रोजी मौजे शिल्लेगाव, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावली आहे. मयत कचरु एकनाथ जाधव आणि मयत चंद्रकलाबाई कचरु जाधव यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत कचरु एकनाथ जाधव आणि मयत चंद्रकलाबाई कचरू जाधव यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगट प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतली जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही शिक्का व सहीनिशी आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 7/2025

अर्जदार : १. सीताबाई भिकाजी औचरमल, २. नंदा तातेराव तुपे, रा.भिमनगर, भावसिंगपुरा, पेठेनगर, औरंगाबाद ३. लक्ष्मीकांत भिकाजी औचरमल, ४. चंद्रकांत भिकाजी औचरमल, रा.राजुरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५. सुर्यकांत भिकाजी औचरमल, ६. शशिकांत भिकाजी औचरमल, अर्जदार नं. १, ३, ५ व ६ रा. तुर्काबाद खराडी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती आणि अर्जदार नं. २ ते ६ यांचे पिता नामे भिकाजी कचरु औचरमल यांचा दि.१५/०१/२०२४ रोजी मौजे तुर्काबाद खराडी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत भिकाजी कचरू औचरमल यांना अर्जदार नं. १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत भिकाजी कचरु औचरमल यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रकट प्रतिद्ध झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात चैतला जोगीर नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही शिक्क्यानी आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा.ए.आय. आवटी साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३८८/२०२४

पुढील तारीख २९/०१/२०२५

अर्जदार :- १. रुख्मन भ्र. विठ्ठल निळ, वयः ७६ वर्षे, धंदा काही नाही, रा. हस्ता, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

२. जिजाबाई रामकिसन सपकाळ, वयः ४० वर्षे, धंदाः घरकाम, रा. गौतम नगर कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. अर्चना संतोष जाधव, वयः ३८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. सोनाली रामकिसन सपकाळ, वयः ३९ वर्षे, धेदाः घरकाम, रा. कळंकी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५. समिर विठ्ठल निळ, वयः ३२ वर्षे, धंदाः शेती, रा. हस्ता, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ६. मंगलबाई भ्र. सुर्यभान निळ, वयः ५५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. हस्ता, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ७. छाया दादाराव गायकवाड, वयः ३६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. वडगाव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद. ८. हिराबाई जगन्नाथ काकडे, वयः ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ९. किरण सुनिल भाडाईत, वयः ३२ वर्षे, धेदाः घरकाम, रा. चापानेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. १०. राणी उध्दव पवार, वयः ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरसर बु., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ११. अमोल सुर्यभान निळ, वयः २७ वर्षे, धंदा शेती, रा. हस्ता, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. १२. आत्माराम वामन जाधव, वयः ५२ वर्षे, धंदाः शेती, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. १३. मिराबाई सुभाष हुळहुळे, वयः ५१ वर्षे, धंदाः घरकाम, रा. मक्रणपुर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, १४. वत्सलाबाई शेषराव सोळंके, वयः ७१ वर्षे, धंदा काही नाही, रा. चिमनापूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. १५. लताबाई सुर्यभान जाधव, वयः ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार १ ते १५ हे मयत तान्हाबाई सखाराम निळ यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डी.एफ. म्हस्के यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते १५ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र. १ व ६ ही मयत तान्हाबाई सखाराम निळ यांची सुन असून अर्जदार क्र. २ ते ५ व ७ ते १३ ते मयत तान्हाबाईचे नातवंडे आहेत. तसेच अर्जदार क्र. १४ व १५ या मयताच्या मुली आहे. मयत तान्हाबाई सखाराम निळ यांना अर्जदार क्र. १ चे पती तसेच अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत विठ्ठल सखाराम निळ तसेच अर्जदार क्र. ६ चे पती तसेच अर्जदार क्र. ७ ते ११ यांचे वडील नामे मयत सुर्यभान सखाराम निळ तसेच अर्जदार क्र. १२ ते १३ हे मयत मनकर्णाबाई वामन जाधव यांची मुले असून अर्जदार क्र. १४ व १५ हे मयत तान्हाबाई सखाराम निळ यांच्या मुली आहे. असे एकुण त्यांना २ मुले व ३ मुली आहेत. मयत तान्हाबाई सखाराम निळ यांचे मयत विठ्ठल सखाराम निळव सुर्यभान सखाराम निळ व मनकर्णाबाई वामन जाधव हे मयत मुल-मुली असून मयतविठ्ठल सखाराम निळ यांचे पत्नी व मुल मुली हे अर्जदार क्र. १ ते ५ असून मयत सुर्यभान सखाराम निळ याचे वारस अर्जदार क्र. ६ ते ११ आहे. तसेच मयत मनकर्णाबाई वामन जाधव यांचे बारस अर्जदार क्र. १२ व १३ हे आहे. तसेच अर्जदार क्र. १४ व १५ हे मयत तान्हाबाई सखाराम निळ यांच्या मुली आहे. असे मयत तान्हाबाई सखाराम निळ यांना अर्जदार क्र. १ ते १५ हे कायदेशीर वारस आहेत. मयत तान्हादाई सखाराम निळ या दि. २३/१२/२०१२ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा हस्ता ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे करण्यात आलेला आहे. तसेच तान्हाबाई यांचा मुलगा विठ्ठल सखाराम निळ हे दि. २४/०२/२०१७ रोजी मयत झालेले असून दुसरा मुलगा सुर्यभान सखाराम निळ हा दि. ०१/०४/२००४ रोजी मयत झाला आहे. तसेच मयत तान्हाबाई यांची मयत मुलगी नामे मनकर्णाबाई वामन जाधव या दि. १९/०७/२०२३ रोजी मयत झाल्या आहे. मयत तान्हाबाई सखाराम निळ यांना अर्जदार क्र. १ ते १५ शिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत तान्हाबाई सखाराम निळ यांना मिळणारा शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसांची नोंद घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अर्जदार हे ग्रामपंचायत मध्ये वारसप्रमाणपत्र घेण्यासाठी गेले असता संबंधीत अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयातून कायदेशीर वारस प्रमाणपत्र घेऊन येण्याचे सांगितले, त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायलयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. दि. ०३/०१/२०२५.

आदेशावरून

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, कन्नड

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अभिनेत्री यामी गौतम लिटल्स डायपर्सची ब्रॅण्ड एम्बेसिडर

मुंबई -पिरेमल फार्मा लिमिटेडच्या इंडिया कन्झ्युमर हेल्थकेअर (आयसीएच) ने लहान मुलांसाठी सुरु केलेल्या लिटल्स ब्रॅण्डसाठी अभिनेत्री यामी गौतमची निवड करण्यात आली आहे. कंपनीने लिटल्सकरिता नुकतीच स्विच टू सॉफ्टर या मोहिमेचा शुभारंभ केल्याची घोषणा केली. स्विचटूसॉफ्टर या मोहिमेसाठी अभिनेत्री यामी गौतम प्रचार करणार आहे. या मोहिमेच्या शुभारंभाप्रसंगी यामीने लिटल्स ब्रॅण्डने लहान मुलांसाठी तयार केलेल्या मुलायमदार डायपर पॅन्टचे अनावरण केले. लहान मुलांची शि-शू १२ तास योग्यरित्या शोषणी जाईल, अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना या डायपरच्या निर्मितत करण्यात आली आहे. या पॅण्डमध्ये ओलावा शोषणा जात असल्याने मुलांना कोणतीही इजा होत नाही. मुलांची त्वचा उत्तमरित्या राखली जाईल, याची काळजी घेण्यात आल्याचे कंपनीच्यावतीने सांगण्यात आले.

## टॉरल इंडिया ने दावोसमध्ये महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर : जागतिक स्तरावरील अग्रगण्य इंटिग्रेटेड अल्युमिनियम कास्टिंग फाउंड्री असलेल्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने सुपा (अहिल्या नगर, महाराष्ट्र) येथील १२,००,००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा सामंजस्य करार वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान दावोस येथील महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये झाला, ज्यामध्ये माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि अन्य वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते. या सुविधेमुळे १२०० हून अधिक स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, या भागातील समुदायाच्या प्रगतीसाठी एक परिवर्तनकारी पाऊल उचलले गेले आहे. श्री. भरत गिते, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, टॉरल इंडिया, या उपक्रमाबद्दल बोलताना म्हणाले, महाराष्ट्रातील एका छोट्या शहरातून आल्यामुळे, मी नेहमीच टियर खख भागातील अफाट क्षमतेवर विश्वास ठेवला आहे आणि त्यांच्या प्रगतीसाठी संधी शोधण्याचा निर्धार केला आहे. २०२० मध्ये मी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींना भेटलो तेव्हा त्यांच्याशी या दृष्टिकोनाबद्दल चर्चा करण्याचे भाग्य मला मिळाले आणि आज त्यांच्याच दूरदृष्टीमुळे हे स्वप्न साकार होत असल्याचे पाहून मला अभिमान वाटतो. या भागात जागतिक दर्जाचे कौशल्य आणि तंत्रज्ञान विकसित करून, जागतिक दर्जाची पायाभूत संस्कृती प्रस्थापित करण्याचा आम्हाला विश्वास आहे. स्थानिक क्षेत्रामध्ये जागतिक कौशल्य आणि नवकल्पनांचे संयोजन करून, सुपाला उत्पादनाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे आणि या भागाच्या विकासासाठी नवीन मानके स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहोत.


## आयसीएसआयने २०२५ सालासाठी नवीन अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड केली

मुंबई : सीएस धनंजय शुक्ला आणि सीएस पवन चांडक यांची २०२५ सालासाठी इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) चे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. सीएस धनंजय शुक्ला, अध्यक्ष, आयसीएस वाणिज्य आणि कायदा पदवीधर, सी.एस. धनंजय शुक्ला हे इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाचे फेलो सदस्य आहेत. त्या एक प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी आहेत आणि कॉर्पोरेट कायदा, सुरक्षा कायदा आणि कर आकारणी या क्षेत्रात त्यांना तज्ज्ञता आहे. सीएस पवन चांडक हे एक पात्र कंपनी सचिव आहेत ज्यांना कामगार कायदे आणि कामगार कल्याण या विषयात विशेष ज्ञान आहे. ते मेसर्स केपीआरसी अँड असोसिएट्सचे संस्थापक भागीदार आहेत ज्यांचे संपूर्ण भारतात पाऊल आहे. सीएस पवन चांडक यांना कॉर्पोरेट कायदा, परकीय चलन कायदा, औद्योगिक कायदा, कायदेशीर मापनशास्त्र, सचिवीय लेखापरीक्षण, लवाद बाबी, एसईझेड, एसटीपीआय, ईओयू आणि डीओटी या क्षेत्रात विविध अनुभव आहे. त्यांनी स्वतंत्र संचालक आणि सल्लागार म्हणून मोठ्या कॉर्पोरेट आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम केले आहे. कॉर्पोरेट कायदेशीर बाबींवर सल्ला देणे, करारांची रचना आणि विलीनीकरण-एकत्रीकरण यासारख्या त्यांच्या कौशल्याच्या क्षेत्रांशी संबंधित आव्हाने आणि समस्यांची त्यांना सखोल समज आहे.

## फर्स्ट ईएएन रुपे क्रेडिट कार्ड लॉन्च

मुंबई: आयडीएफसी फर्स्ट बँक, भारतातील जागतिक कार्ड पेमेंट नेटवर्क रुपे यांच्या भागीदारीत,यूपीआय सक्षम रुपे क्रेडिट कार्ड - फर्स्ट ईएएन लॉन्च करण्याची अभिमानाने घोषणा केली आहे. हे क्रेडिट कार्ड फिक्स्ड डिपॉझिटद्वारे समर्थित आहे आणि म्हणूनच प्रत्येकजण ऑनलाइन या युनिक क्रेडिट कार्डचा त्वरित वापर करण्यास पात्र आहे. ते यूपीआय पेमेंटवर कॅशबॅक देखील देते, ज्यामुळे वापरकर्त्यांसाठी उत्पादन फायदेशीर ठरते.त्याची खासियत अशी आहे की सर्व ग्राहकांसाठी क्रेडिट कार्ड अर्जामध्ये मुदत ठेव निर्मिती अखंडपणे एकत्रित केली जाते.

## श्री स. भु. प्रशालेच्या पद्माकर वाघरूळकर यांना तेजस फाऊंडेशनचा आदर्श शिक्षक, साहित्यिक, पत्रकार पुरस्कार प्रदान



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २४ : पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीनचे शिक्षक वसुप्रसिद्ध साहित्यिक पद्माकर दत्तात्रय वाघरूळकर (दत्तिंदुसुत) यांना तेजस फाऊंडेशन नाशिकचा आदर्श शिक्षक, आदर्श साहित्यिक व आदर्श पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार सोहळा डॉ.मौलाना आझाद संशोधन केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे अशोक कपूर (सिने अभिनेता व दिग्दर्शक, मुंबई), राजू मोरे (अभिनेता व दिग्दर्शक, मुंबई), विनोद सदानंद खंडारे (सिने अभिनेता, नागपूर), सुरेशभाऊ डोळस (ज्येष्ठ अभिनेता, पुणे) आणि तेजस फाऊंडेशनच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध अभिनेत्री व कवयित्री मेघा डोळस यांच्या उपस्थितीत पार पडला. पद्माकर वाघरूळकर यांच्या या यशाचे कौतुक श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगरचे सरचिटणीस सुप्रसिद्ध नेत्ररोगजतज्ज्ञ डॉ. श्रीरंग देशपांडे, बिडकीन शाखेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, ज्ञानेश्वर चाटूपळे, बाबासाहेब सोकटकर, राजू शिंदे,व सर्व शिक्षक, विद्यार्थी, साहित्यिक व पत्रकार मित्रांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते आज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात विविध विकास कामांचे भूमिपूजन

### शेतकरी, नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ जानेवारी

सोयगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उभारण्यात येणाऱ्या कार्यालय ईमारत, व्यापार संकुल, अंतर्गत सिमेंट रस्ता, प्रवेशद्वार अशा विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा माजीमंत्री आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते आज शनिवार (दि.२५) रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या भूमिपूजन सोहळ्यास जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे,माजी सभापती राजेंद्र राठोड, सिल्लोडचे माजी नगराध्यक्ष युवानेते अब्दुल समीर अ.सत्तार, सोयगाव न.प.नगराध्यक्षा श्रीमती आशाबी तडवी, उपनगराध्यक्षा सुरेखाताई प्रभाकर काळे आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास शेतकरी, व्यापारी व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाजार समितीचे सभापती केशवराव पा.तायडे, उपसभापती दारासिंग चव्हाण व संचालक मंडळाने केले आहे.

# शहरातील रजाळवाडी येथे नगर परिषद अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृह बांधकामाचे भूमिपूजन




सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि. २४, शहरातील रजाळवाडी येथे नगर परिषद अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या सामाजिक सभागृह बांधकामाचे भूमिपूजन युवानेते तथा माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.

यावेळी युवानेते अब्दुल समीर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. शहरातील रजाळवाडी येथे सामाजिक सभागृहाचे लोकार्पण करताना मला मनापासून आनंद होत आहे. या सभागृहात सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करता येणार असल्याने हे सभागृह येथील नागरिकांसाठी सोयीचे ठरेल असा विश्वास युवानेते अब्दुल समीर यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, माजी नगरसेवक सुनील दुधे, राजू गौर , शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हा प्रमुख दुर्गाबाई पवार, माजी उपनगराध्यक्षा शकुंतलाबाई बन्सोड, शेतकरी कार्यकारी सोसोयटीचे व्हाईस चेअरमन टेकचंद दुधे, युवासेनेचे शिवा टोम्पे,फहिम पठाण, सुनील पांडुरंग दुधे, सचिन गोरे, महेश पाटील, अमोल कुदळ, मधुकर हासे, नामदेव दुधे, वामन दुधे, अजिनाथ दुधे, गणेश दुधे, देविदास सुरडकर , बाजीराव दुधे, भगवान दुधे, राजधर दुधे, अंबादास दुधे, अक्षय अग्रवाल, स्वप्नील शेळके, नगर परिषदेचे अधिकारी अन्वर पठाण, अजीम शेख, गोरखनाथ धाडगे आदिंसह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अवैध वाळू वाहतूक करणारे डंपर पोलीसांनी पकडले; वडगाव(तिगजी) जवळील घटना



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ जानेवारी

भडगाव तालुक्यातून चोरीच्या उद्देशाने वाळू ची वाहतूक करणारे डंपर गुरुवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास रात्रीच्या गस्तीत सोयगाव पोलीसांनी रंगेहाथ पकडून सोयगाव पोलीस ठाण्यात जप्त केले आहे.या कारवाई मुळे विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्याचे धाबे दनानाले आहे याप्रकरणी डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेख मूक्तार शेख शब्बीर( वय.३८) रा.तलवाडा ता. चाळीसगाव असे चालकाचे नाव असून नागद -बनोटी रस्त्यावर भडगाव तालुक्यातून चोरीच्या उद्देशाने विनापरवाना वाळूची वाहतूक करणारे डंपर क्र-एम.एच-२० बी.जी-५२७७ यामध्ये पाच ब्रास वाळू आढळून आली.

दरम्यान वाळू वाहतुकीची कोणतीही परवानगी नसतांना विनापरवाना वाळूची वाहतूक करतांना पोलीस उपनिरीक्षक गणेश झलवार यांच्या निदर्शनास आले त्यांनी डंपरच पाठलाग करून वडगाव(तिगजी) फाट्यावर पकडले. दरम्यान वाहन चालक शेख मूक्तार शेख शब्बीर( वय.३८) रा.तलवाडा ता.चाळीसगाव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाई मध्ये बारा लक्ष रु चे डंपर सह २५ हजार रुची वाळू असा एकूण बारा लाख,२५ हजार रु चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.दरम्यान विनापरवाना वाळूची वाहतूक प्रकरणी सोयगाव पोलीसांनी कारवाई करून सोयगाव तहसील कार्यालयात पत्र दिले आहे. त्यामुळे आता महसूल कडूनही कारवाई करण्यात येणार आहे. पुढील तपास सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गणेश झलवार, रजाक शेख, सादिक तडवी, राजू बर्डे, रवींद्र तायडे, अजय कोळी, गजानन दांडगे,आदी करत आहे.

## 'मिशन अयोध्या' चित्रपटाला प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या लोकार्पण वर्षपूर्तीचे औचित्य साधत, शुक्रवार २४ जानेवारी २०२५ रोजी 'मिशन अयोध्या' हा बहुचर्चित चित्रपट महाराष्ट्रभरातील १३० हून अधिक चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे.

चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाचे सर्वच शो हाऊसफुल्ल आहेत. प्रभू श्रीरामांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या रामराज्याची संकल्पना पुढे नेण्यासाठी प्रेरणादायी ठरणारा हा चित्रपट त्याच्या सशक्त कथेमुळे प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यातही अव्वल आहे. निर्माते कृष्णा दादाराव शिंदे, योगिता कृष्णा शिंदे त्यांच्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' हा केवळ एक मनोरंजनात्मक चित्रपट नसून, रामभक्तांच्या हृदयातील प्रभू श्रीरामांशी जोडणारा आणि त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत नेणारा एक प्रेरणादाई प्रवास आहे.

## गौतम दांडगे यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ जानेवारी

तालुक्यातील जरंडी येथील गौतम भागाजी दांडगे(वय-४९) यांचे शुक्रवारी (दि.२४) पहाटे पाच वाजता हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुली,एक मुलगा,एक भाऊ,सून नातवंडे असा परिवार आहे.

# संविधान गौरव दिन अभियान खुलताबाद येथे संपन्न



तभा वृतसेवा २४

खुलताबाद प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज खुलताबाद येथील प.पु. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरातील स्वच्छता करून पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच संविधानाचे महत्व सांगुन सामूहिक प्रार्थना करण्यात आली तसेच कमला नेहरू विद्यालयांमध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन करून उत्कृष्ट रांगोळी काढणाऱ्या मुलींना पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टी जिल्हा सरचिटणीस ज्योतीताई गायकवाड जिल्हा संयोजक अविनाश गायकवाड, तालुका संयोजक जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस एल जी गायकवाड, ,तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, अविनाश गायकवाड, ,शहराध्यक्ष परसराम बारगळ ,सतीश दांडेकर, किशोर भावसार, योगेश बारगळ ,,सागर मातकर, लक्ष्मण थोरात, शंकर काका अंभोरे ,अशोक तुपे, काशिनाथ तुपे ,मोहन तुपे, सुखदेव ठेंगडे, अविनाश वेताळ, सौरभ खंडेलवाल, प्रशांत गदानकर, व तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी विशिष्ट ओळख पत्राचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा : मयूर मनगटे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ जानेवारी : कृषी आधुनिकीकरण आणि शेतकऱ्यांसाठी सेवा सुव्यवस्थित करण्याच्या महत्त्वपूर्ण हालचालीमध्ये,महाराष्ट्र सरकारने ग्रिस्टॅक महाराष्ट्र शेतकरी नोंदणी उपक्रम सुरू केला आहे.या परिवर्तनशील डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्दिष्ट शेतकरी,त्यांची जमीन आणि कृषी पद्धती यांचा केंद्रीकृत डेटाबेस तयार करणे आहे. असे केल्याने सरकारी योजनांची वेळेवर आणि कार्यक्षम वितरणाची आणि योग्य लाभार्थ्यांना थेट लाभ मिळणे सुनिश्चित होते.

ॲग्रिस्टॅक महाराष्ट्र शेतकरी नोंदणी २०२५ काय आहे?

ग्रिस्टॅक महाराष्ट्र पोर्टल (@ mhfr.agristack.gov.in) हा एक अत्याधुनिक उपक्रम आहे जो शेतकऱ्यांना एक युनिक फार्मर आयडी प्रदान करतो.हा आयडी आधार,बँक खात्याची माहिती आणि जमिनीच्या नोंदी यासारखे महत्त्वपूर्ण तपशील एकत्रित करतो. किसान क्रेडिट कार्ड कार्यक्रम आणि किमान आधारभूत किंमत लाभांसह १०० हून अधिक कृषी योजनांमध्ये प्रवेश सुलभ करतो.शेतकरी आयडीचे फायदे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर : सबसिडी आणि कल्याण पेमेंट्स थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अचूक आणि वेळेवर हस्तांतरित करणे सुनिश्चित करते.

सरलीकृत स्कीम ॲक्सेस: पेपरवर्क कमी करते आणि सरकारी योजनांमध्ये त्रास-मुक्त प्रवेश सक्षम करते.

सुव्यवस्थित पीक विमा दावे: पीक विमा भरण्याची आणि प्राप्त करण्याची प्रक्रिया सुलभ आणि अधिक कार्यक्षम करते.सुधारित क्रेडिट ॲक्सेस: शेतकऱ्यांना सत्यापित क्रेडेन्शियलसह कर्ज सुरक्षित करण्यात मदत करते.

मार्केट लिंकेज: शेतकऱ्यांना खरेदीदार आणि बाजारपेठांशी जोडते, उत्पन्नाच्या संधी वाढवतात. लक्ष्यित इनपुट सबसिडी: खते, बियाणे आणि इतर कृषी निविष्ठांचे योग्य वितरण सुनिश्चित करते. अश्या या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असणारे कार्ड भाजपा युवा मोर्चा मार्फत सोयगाव शहरात शेतकऱ्यांना धरती ॲग्रो बँक ऑफ महाराष्ट्र च्या समोर येथे काढून देण्यात आहे.तरी सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान युवा मोर्चा शहराध्यक्ष मयूर मनगटे,भाजपचे सुनील गवांडे,मंगेश सोहनी,राहुल परदेशी यांनी केले आहे.

# गोवा येथे राष्ट्रीय कराटे स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरचा संघ विजयी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ जानेवारी : गोवा, पोंडा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे १८ व १९ जानेवारी रोजी झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत. मिशन मार्शल आर्ट्स अँड वुशु कुंग-फु स्पोर्ट्स कराटे असोसिएशन (इंडिया) छत्रपती संभाजीनगर चा संघाने काता / कुमिते मध्ये २४ सुवर्ण १२रोप्य १४कास्य पदक जिंकून तृतीय पारितोषिक आपल्या नावे केले.या स्पर्धेचे आयोजन ट्रॅडिशनल कराटे डो ओकिनावा अँड कुबडो कैकोकाय गोवा इंडिया या संघटने केले होते.. प्रमुख पाहुणे ग्रँड मास्टर लानम लामा,रेंशी अयान चक्रवर्ती, दीपक कुराडे याच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक वितरण करण्यात आले. मिशन मार्शल आर्ट्स असोसिएशन छत्रपती संभाजीनगर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मास्टर पवन घुगे, सचिव व मुख्य कराटे प्रशिक्षक प्रविण घुगे, महिला प्रशिक्षिका नंदा घुगे ,राधा घुगे, यांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभत आहेत.विजेयी झालेलेल्या विद्यार्थ्यांचे खालीलप्रमाणे नावे

मुली :- कु. तनुश्री घुगे ( २ सुवर्ण पदक), अनुश्री घुगे ( २ सुवर्ण पदक ) ओजस्वी बारगजे ( २ सुवर्ण पदक ) आर.अरुंधती ( २ सुवर्ण पदक) ओवी पाटील ( २ सुवर्ण पदक ) आश्लेषा रिडलॉन ( २ सुवर्ण पदक ) समीक्षा जांभळकर ( २ सुवर्ण पदक ) तनुश्री राठोड ( सुवर्ण व कास्य पदक) , सॉची लहाने ( सुवर्ण व कास्य पदक ) ऋतुजा भालेराव ( २ रोप्य पदक ) जोहा सय्यद ( २ रोप्य पदक ) नव्या दरगड ( रोप्य व कास्य पदक ) स्वनिका जैन,( रोप्य व कास्य पदक ) ओजस्वी करांडे ( २ कास्य पदक.मुले - अर्णव रिडलॉन ( २ सुवर्ण पदक ) जय राठोड ( सुवर्ण व रोप्य ) अभिजित देशमुख ( सुवर्ण व कास्य पदक ) गजराज चावरिया ( सुवर्ण व कास्य पदक ) रुद्र चव्हाण ( सुवर्ण व रोप्य पदक ) मयूर चव्हाण ( सुवर्ण व रोप्य पदक ) श्रेयश पेरे.( सुवर्ण व कास्य पदक ) ) स्वराज गायकवाड ( २ रोप्य पदक ) वीरेंद्र राठोड ( रोप्य व कास्य पदक ) रुत्विक जोशी ( २ कास्य पदक ).आयुष ठाणगे ( सुवर्ण व कास्य पदक ) जिंकले या सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षिका कोमल राठोड, ऋतुजा रणवाळकर, व कराटे प्रशिक्षक शाम बुधवंत, राम बुधवंत, राम चौरे,गौरव टोकटे, कृष्णा कानडे व पालकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (२३) **त्याग**

मी आणि राष्ट्र एकच आहे. हा भाव प्रत्येकामध्ये असणे यासाठी संघ प्रयत्नशील आहे. काहीजण मोठ्या अभिमानाने म्हणतात मी राष्ट्रासाठी खूप त्याग केला. परंतु जसे स्वतःच्या कुटुंबा करता केलेला त्याग हा स्वार्थत्याग नाही तसेच राष्ट्ररूपी कुटुंबाची सेवा करणे स्वार्थत्याग नाही; राष्ट्रासाठी खर्च करणे, कष्ट करणे त्यासाठी झिज सोसणे हे तर प्रत्येकाचे पवित्र कर्तव्य आहे. या संस्कारामुळेच संघ स्वयंसेवक देशभरात जवळपास २000 सेवा प्रकल्प चालवतात. या प्रकल्पांची आपण पुढे थोडक्यात ओळख करून घेऊच समाजोपयोगी काम करण्यामागे स्वार्थाची भावना नको. सारे जण आपले खाणे-पिणे-भोजन निवास- संतती या सर्वांच्या निर्मितीसाठी कष्ट करतात. आपल्या देशाच्या निर्मितीसाठी पण असे कष्ट उपसणे आवश्यक असते. राष्ट्र निर्माण व व्यक्ती निर्माण साठीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन केला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात संघ भावी हिंदु राष्ट्राची आशा आहे व 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या विचाराची भावी पिढी निर्माण करण्याचे एकमेव स्थान आहे. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## गंगापूर बसस्थानकात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती निमित्त स्वच्छता मोहीम



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२४ :हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती निमित्ताने गंगापूर बसस्थानक येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याप्रसंगी श्रीमुक्तानंद विद्यालयाचे प्राध्यापक राष्ट्रीय सेवायोजन चे विद्यार्थी व जिजाऊ फाउंडेशन गंगापूर यांनी सामाजिक कार्यात सहभाग म्हणून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

यावेळी गंगापूर नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा तथा जिजाऊ फाऊंडेशनच्याअध्यक्षा सुवर्णाताई जाधव, उपप्राचार्य विशाल साबणे आगार प्रमुख विजय बोरसे , स्थानक प्रमुख सुभाष भापकर ,वाहतूक निरीक्षक सौ जारवाल, आगार लेखाकार अतुल बनसोड, सवानी संदीप बागुल, पाळी प्रमुख भुतेकर, तसेच वाहतूक नियंत्रक, यांत्रिक, पर्यवेक्षक कर्मचारी, लिपिक, चालक, वाहक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी आगार प्रमुख बोरसे यांनी वर्षभर स्वच्छता ठेवण्याचे आवाहन करत विभागात गंगापूर बसस्थानकाला पारितोषिक कसे मिळवता येईल याकरीता प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

## नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी



सिल्लोड (प्रतिनिधी) दि.२३, : सिल्लोड येथे तालुका शिवसेनेच्या वतीने शिवसेनाप्रमुख, हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे चौकातील स्मारकास माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच आ.अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे शिवसेनाप्रमुख, हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्व. बाळासाहेब ठाकरे व सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, संचालक नंदकिशोर सहारे, शेख जावेद, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, शिवसेना तालुकाप्रमुख मारुती पा. वराडे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, खालेक पटेल, युवासेनेचे शिवा टोम्पे, संतोष धाडगे, प्रवीण मिरकर, फहिम पठाण, कुणाल सहारे, रवी गायकवाड, यांच्यासह दादाराव पंडित , भगवान टोम्पे, कृष्णा वाघ, भाऊराव दुधे, दिलीप वाघ, आनंदा दुधे, राजेश्वर आरके, आनंद सिरसाट, सुनील पांडुरंग दुधे , मनोहर आरके, सुनील धाडगे, गौरव सहारे, गणेश शेलार , अक्षय चंदनसे, बबन दुधे, इंद्रसिंग दुधे, सतीश सिरसाट,शेख मोईज, निवृत्ती वरपे, रवी आरके आदींची उपस्थिती होती.

## तहसील कार्यालय परिसरात बोकाळली अस्वच्छता



तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पैठण तहसील कार्यालय परिसर तसेच ध्वजारोहण स्तंभा लगत काटेरी झुडपे तसेच जंगली गवतामुळे प्रचंड अस्वच्छता पसरली असून ध्वजारोहणा अगोदर सदरील परिसर स्वच्छ होईल अशी माहिती नायब तहसीलदार राहुल बनसोड यांनी दिली.

शहराबाहेर निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या पैठण तहसील कार्यालय परिसरात काटेरी झुडपे तसेच ईतर जंगली झाडांमुळे प्रचंड अस्वच्छता पसरली असून एका दिवसावर प्रजासत्ताक दिवस येऊन ठेपला आहे. तालुक्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयाला स्वच्छतेची शिकवण देणाऱ्या तहसील कार्यालय परिसरातच अस्वच्छता बोकाळल्याचे चित्र आहे. दरम्यान वरील परिसराची स्वच्छता हाती घेण्यात आली असून शनिवारी सर्व परिसर स्वच्छ होईल अशी माहिती नायब तहसिलदार राहुल बनसोड यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सेलूत केमिस्ट भवन उभारण्यासाठी सहकार्य करु- ना.साकोरे

**शिवाजी आकात**

**सेलू ,/प्रतिनिधी-:** रक्तदान शिबीरे ही काळाची गरज असून सामाजिक उत्तरदायित्व म्हणून तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे तसेच ती एक चळवळ झाली पाहिजे त्यासाठी आपण सेलूत केमिस्ट भवनाच्या उभारणीसाठी सहकार्य करू असे प्रतिपादन राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी केले.

अखिल भारतीय व महाराष्ट्र केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री जगन्नाथ आप्पा शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसा निमित्य परभणी जिल्हा केमिस्ट असोसिएशनच्या अंतर्गत सेलू तालूका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने येथील साईनाट्य गृह परिसरात शुक्रवार दिनांक २४ जानेवारी रोजी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना त्या बोलत होत्या.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती दिनकर वाघ, डॉ ऋतुराज साडेगावकर , डॉ संजय रोडगे, ॲड दत्तराव कदम, अशोक अंभोरे, शिवाजीराव खेडकर,सुंदर गाडेकर , नामदेव पांचाळ, अजय डासाळकर, संदीप टाक , केदार गजमल यांची उपस्थिती होती.

या रक्तदान शिबीरात ३०० रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदानाचा उच्चांक नोंदवला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष सदीप टाक सुत्रसंचालन सुभाष मोहकरे तर कैलास काळे यांनी आभार मानले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी परभणी मेडीकल कॉलेज चे डॉ राकेश शिंगदणे, दत्ता रासवे,रामा रेंगे , मंजेस खिल्लारे , तेजस पतंगे, आकाश भालेराव ,विकास रहाटकर , मकरंद कुलकर्णी, जयश्री कांबळे, प्रतिक्षा कदम यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच सुनीलबापु डख, माणिकराव डर, शिवनारायण मालाणी , प्रेमराज चव्हाण , मुकेश खेडेकर, समिर नाईकवाडे, प्रविण लोया, सतीश मुरकुटे , शौकत बागवान , शेख आमजद , गणेश साडेगावकर , लक्ष्मण पौळ, चंद्रकांत गटकळ, दिपक मंत्री , स्वप्नील जाधव , सोळके, गबाळे , गात यांच्यासह मेडीकल असो.च्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...

### विद्यार्थ्यांनी उच्च ध्येयाकडे मार्गक्रमण करावे- क्रीडा अधिकारी कविता नावंदे

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात उच्च ध्येयाकडे मार्गक्रमण केले पाहिजे, असे आवाहन क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी केले.

येथील सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूलमध्ये आयोजित क्रीडा दिन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ. जया जाधव उपस्थित होत्या. पुढे बोलताना नावंदे यांनी क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यामुळे विविध क्षेत्रात मिळणाऱ्या संधींची विद्यार्थिनींना माहिती दिली.

क्रीडा दिनानिमित्त शाळेत विविध क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन यशवंत मकरंद यांनी तर आभार प्रदर्शन विठ्ठल शिंदे यांनी मानले. यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक सुशीलकुमार देशमुख, सौ. प्रणिता पांचाळ, सौ. अरुणा पाटील, सौ. आशा देशमुख, रमेश मुळे, सिताराम ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

### १४ ते १७ फेब्रुवारी दरम्यान कृषि संजीवनी महोत्सव
### आनंद भरोसे यांची माहिती : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार उद्घाटन



**परभणी,/प्रतिनिधी :** स्व. ॲड. शेषराव धोंडजी भरोसे यांच्या स्मृतीनिमित्त पाचव्यांदा संजीवनी मित्र मंडळाच्या वतीने येथील संत तुकाराम महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते १७ फेब्रुवारी दरम्यान राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन कृषी संजीवनी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिवसेना नेते तथा संयोजक आनंद भरोसे यांनी दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून उद्घाटन समारंभास आरोग्य राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार राजेश विटेकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती भरोसे यांनी शुक्रवारी (दि.२४) आयोजित केलेल्या पत्रकार परिषद दिली. यावेळी बाळासाहेब पानपट्टे, सचिन पाटील यांची उपस्थिती होती.

कृषी संजीवनी महोत्सवात निरनिराळे ६ दालन उभारण्यात येणार आहेत. हे दालन अत्याधुनिक डोम पद्धतीचे भव्य जम्बो मंडप उभारले जाणार आहेत. तसेच प्री - फॅ ब्रिकेटेड स्टॉल्स उभारले जाणार आहेत. या प्रदर्शनात २०० हून अधिक कृषी उत्पादनाचे स्टॉल सहभागी होणार आहेत. तसेच या मंडपामध्ये कॉन्फरन्स हॉल देखील उभारण्यात येत असून त्यामध्ये शेतकरी बांधवाकरिता शेती विषयक चर्चासत्र व परिसंवाद, परभणी जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कृषी प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञान, बी - बियाणे, सेंद्रीय शेती, पद्धती, गांडूळ खत निर्मिती, पशुखाद्य, ट्रॅक्टर, आधुनिक शेती अवजारे, रासायनिक खते, कृषी मार्गदर्शक पुस्तके, ठिंबक सिंचन, सोलार उत्पादने, महिला बचत गटांची उत्पादने, गृहोपयोगी वस्तू, धान्य महोत्सव असे अनेक स्टॉल्स लागणार आहेत. हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामुल्य असून परभणी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी कृषी प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन संयोजक आनंद भरोसे व संजीवनी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, ६ किलो वजनाचा कोंबडा, सर्वात बुटकी म्हैस, ३० किलोचा चिनी बोकड हे या प्रदर्शनाचे आकर्षण ठरणार असून माफक दरात शेतकरी व नागरिकांसाठी हेलिकॉप्टरची ७ मिनिटांची सैर आयोजित केली आहे, अशीही माहिती भरोसे यांनी दिली.

तरुण भारत
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## सर सय्यद अहेमद खान उर्दू प्राथमिक शाळा गुलशन कॉलनी जिंतूर येथे आनंद नगरी उत्साहात साजरी



**जिंतूर,/प्रतिनिधी:** मारिया बहुदेशी महिला मंडळ आज दिनांक १८/०१/२०२५ रोजी बुधवार जिंतूर संचालित सर सय्यद अहेमद खान उर्दू प्राथमिक शाळा गुलशन कॉलोनी जिंतूर येथे सकाळी १०.३० वाजता आनंद नगरीत सादर करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांची व पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. या आनंद नगरी मध्ये १४० दुकाने (स्टॉल) टाकण्यात आली होती. या माध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःचा व्यवसाय कसा करायचा याचा मुलाचे अनुभव त्यांना या कार्यक्रमात जाणवले .तसेच या आनंदनगरीमध्ये एकूण एक लाख पंचवीस हजार रुपये पेक्षा जास्त रुपयांच्या उलाढाल झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.के. अहेमद शेख अफसर (जेष्ठ पत्रकार जिंतूर) होते. उदघाटक श्री. बुद्धीराज ज्ञानोबा सुकाळे (पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन जिंतूर) यांनी केले. प्रमुख पाहुणे पत्रकार व इलेक्ट्रॉनिक मीडियाची प्रतिनिधी उपस्थित होते.आनंद नगरीचा कार्यक्रम मौलाना हुसेन अहेमद मदनी फंक्शन हॉल ज़म ज़म कालोनी जिंतूर मध्ये होता. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व इत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## आशा वर्कर अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे आरोग्य शिबीर संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील आर.पी. हॉस्पिटल व परभणी मेडिकल कॉलेज यांच्या वतीने आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे आरोग्य शिबीर पार पडले.
या शिबिरा मार्फत जवळपास ४०० आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यक ते मार्गदर्शन आणि उपचार उपलब्ध करून देण्यात आले.
या शिबिरात मुख्यतः रक्तदाब, शुगर तपासणी, स्त्री रोग आणि इतर सामान्य रोगांसाठी चाचण्या घेण्यात आल्या.
शिबिराचे उद्घाटन आ. डॉ. राहुल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी परभणी मेडिकल कॉलेज आणि आर पी हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, वैद्यकीय अधीक्षक अमीर तडवी आदी उपस्थीत होते.
आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी आरोग्यविषयक टिप्स दिल्या. त्यांचे मानसिक आरोग्य आणि शारीरिक आरोग्य चांगले राहण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.
यावेळी आ.डॉ.पाटील म्हणाले की,आशा वर्कर,अंगणवाडी सेविका व मदतनीस हे समाजासाठी अत्यंत महत्वाचा घटक आहेत.



ग्रामीण भागात आरोग्य दर्जा सुधारण्यासाठी संबंधीत कर्मचाऱ्याचे कार्य महत्वपूर्ण आहे. आज ग्रामीण भागातील नागरीकांत आरोग्य विषयक जागरूकता संबंधित घटकाच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. त्यामुळे आजच्या शिबिरातून संबंधित कर्मचाऱ्याना ग्रामीण भागातील आरोग्य दर्जा आणखी सुधारण्यास निश्चीत मदत होईल असा विश्वास आ.पाटील यांनी व्यक्त केला. त्यामुळे भविष्यातही आशावर्कर, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यासाठी वेळोवेळी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येणार आहेत असे आ.डॉ.पाटील यांनी सांगितले.
यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिंदे म्हणाले की, या शिबिराचे आयोजन संबंधित कर्मचाऱ्यासाठी एक मोठे पाऊल ठरले आहे. या शिबिरामुळे ग्रामीण भागात कार्य करताना संबंधित कर्मचाऱ्याना आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यास निश्चित मदत होईल असा विश्वास अधिष्ठाता डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.




जिंतूर-शिवसेना ऊ बा ठा कार्यालय जिंतूर येथे वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी जिंतूर शिवसेनाऊबाठागटाचे तालुकाप्रमुख रामजी शर्मा बंडूभाऊ लांडगे शिवसेना शहरप्रमुख अरविंद कटारे उद्धव काजळे सोपान लांडगे विठ्ठल राठोड आदीं दिसत आहेत.

## महामार्ग पोलिस केंद्रावर आरोग्य शिबीर संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी:** राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आज दिनांक २३ /०१/२०२५ रोजी महामार्ग केंद्र जिंतूर येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
या आरोग्य शिबिरात म.पो केंद्र जिंतूर येथील अधिकारी व अंमलदार तसेच ट्रक चालक ,जीप चालक, ट्रॅक्टर चालक यांचे बीपी शुगर व लिक्विड प्रोफाइल चेक करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.बामणे शासकीय रुग्णालय जिंतूर ,डॉक्टर व्ही. बी.चव्हाण, डॉ गणेश देशमुख, कर्मचारी समीर दरग ,शेख तौफिक ,दिनेश कांबळे सर्व शासकीय रुग्णालय जिंतूर येथील कर्मचाऱ्यांच्या मदतीने आरोग्य शिबिर घेण्यात आले.
महामार्ग पोलीस अधीक्षक रूपाली दरेकर मॅडम व उपाधीक्षक श्रीकांत दिसले, पोलीस निरीक्षक पठाण यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक जाधव, पोउपनी इनामदार, कदम पोलीस अंमलदार अमोल शेंडगे, भागवत घोडके, व्यंकट नरवडे, महेश केदारी, विकास जोंधळे, श्रीकांत कदम, कपिल घोडके, मारुती गोत्राम, वाल्मीक चव्हाण, मनोहर हाके, सूर्यकांत, पारखे, काळे, मेतके, नैतान, गिराम, शाकीर अली, सावंत, कांदे, काजी, आंधळे आदींची उपस्थिती होती



## रायरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय धर्मापूरी येथे नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

**परभणी,/प्रतिनिधी-** ज्ञानसाधना प्रतिष्ठान येथील आज दिनांक २३/०१/२०२५ रोजी रायरेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती संस्थेचे संस्थाध्यक्ष मा.प्रा. श्री.किरण सोनटक्के सर व संस्थेच्या सचिव मा.प्रा.सौं. शीतल सोनटक्के मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री.खपरले सर उपस्थित होते.कार्यक्रमाला सर्व विभाग प्रमुखांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी श्री.खपरले सर यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख नईम सर यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भोरकडे सर यांनी केले.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे सर्व समन्वयक,विभाग प्रमुख,सर्व शिक्षक वृंद ,शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### ई-निविदा सूचना क्र.३० सन २०२४-२५

मुख्याधिकारी, न.प. पूर्णा जि.परभणी हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२४-२५ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग खात्याकडे(स्थापत्य) योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून नगर परिषद पूर्णा जि.परभणी, पूर्णा अंतर्गत सहा (०३) कामा करिता ई-निविदा प्रणालीद्वारे दि.२३/०१/२०२५ वेळ १८ :०० वा.पासून ते दि.३०/०१/२०२५ वेळ १७.०० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. शक्य झाल्यास निविदा दि.०३/०१/२०२४ रोजी सकाळी ११०० उघडण्यात येईल.

**टीप :** वरील ई-निविदेमध्ये सहा (०३) काम समाविष्ट आहे. सदरील निविदेसंबंधी सर्व माहिती हि महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व या निविदेसंदर्भात पुढील शुध्दीपत्रके / मुदतवाढ इ. फक्त याच संकेतस्थळावर उपलब्ध / प्रकाशित करण्यात येतील.

मुख्याधिकारी
नगर परिषद पूर्णा
जि.परभणी

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कळमनुरी, वसमत येथील शेतकऱ्यांचा शक्तीपीठ महामार्गाला तीव्र विरोध

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

पवनार पत्रादेवी नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती महामार्गामुळे वसमत आणि कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचा बागायती जमीन असून शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान होणार आहे. अनेक शेतकरी या महामार्गामुळे भूमीहीन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा महामार्ग रद्द करण्यात यावा अशी मागणी करीत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

शासनाने पवनार पत्रादेवी नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग तयार करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी शेतकऱ्यांना हा मार्ग रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. यासंदर्भात शासनाच्या राजपत्रात शेतकऱ्यांच्या शेताचे गट क्रमांक व क्षेत्र नमुद आहेत. हा महामार्ग हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील गिरगाव, पळसगाव, पिंप्रा चौरे, गुंज, रूंज, आसेगाव, टाकलगाव, राजापूर, बाभूळगाव, रेणकापूर, लोण बु., हयातनगर, जवळा खु., तसेच कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा, भाटेगाव, जामगव्हाण, सुकळीवीर, जवळा पांचाळ, वसफळ, महालिंगी, दाभडी या गावातून जाणार आहे. वसमत तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेतीचे प्रचंड नुकसान होणार आहे. बहुसंख्य शेतकरी भूमीहीन होणार आहेत. या भागातील शेती बागायती असून शासनाने आखलेल्या या व्यावसायिक प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान होणार आहे.

सदरचा महामार्ग तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी स्थगित करण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते. परंतु शासनाने या महामार्गासाठी पर्यावरण प्रमाणपत्र मिळविण्याची कार्यवाही चालू केली असून एका दिवसात परवागीही मिळवली आहे. तसेच जिल्हाधिकारी यांचेसोबत भूसंपादन करण्यासाठी आढावा बैठकांचे आयोजनही करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना अंधारात ठेवून महामार्गाचे काम अन्यायकारक पध्दतीने रेटण्याचा प्रयत्न निषेधार्ह असून शेतकऱ्यांमध्ये याबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे. या महामार्गाची प्रक्रिया सुरू केल्यास शेतकऱ्यांचा उद्रेक होणर आहे. त्यामुळे हा महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी वसमत आणि कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत या महामार्गाला तीव्र विरोध केला. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# हिंगोलीत सहकार भारतीच्यावतीने दोन दिवशीय प्रशिक्षण




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

हिंगोली येथे सहकार भारती स्थापना दिनानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील नागरी सहकारी पतसंस्थांमधील संचालक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी दोन दिवसीय पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले.

येथील हॉटेल गणेश इनमध्ये आयोजित कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपनिबंधक एस.एल बोराडे, नॅफकॅफ दिल्लीचे संचालक सुनील देवडा, सहकार भारतीचे प्रदेश सहसंघटक प्रमुख विजयराव देशमुख, प्रदेश पतसंस्था सहप्रकोष्ट प्रमुख जनकराज खुराणा, प्रदेश सचिव सुनील मोतलग, नागनाथ अर्बन को-ऑप. बँकेचे अध्यक्ष ॲड सतीश देशमुख, ओमप्रकाश देवडा पिपल्स बँकेचे संचालक संजय देवडा, वैजनाथअप्पा सराफ मराठवाडा नागरी बँकेचे संचालक सुरेशआप्पा सराफ, संत नामदेव नागरी पतसंस्थेचे संचालक, डॉ. किशन लखमावार, काशीनाथराव दराडे, बालाजी गलंडे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ए.एस. गुसिंगे, सहकार भारतीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाशचंद सोनी, जिल्हा महामंत्री सुनीलकुमार सिन्हा आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले की, सहकारी संस्थेच्या संदर्भातील ज्या अडचणी येतील त्या सोडवण्याचा प्रयत्न प्रशासनातर्फे करण्यात येईल. पतसंस्थेच्या माध्यमातून बचतगटांना कर्ज देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचे काम करावे असे त्यांनी सांगितले.

सुनील देवडा, ॲड सतीश देशमुख यांनी सहकार विषयी मार्गदर्शन केले. तसेच बँकिंग तज्ञ धनंजय तांबेकर यांनी पतसंस्था व्यवसाय वृध्दीसाठी करावयाचे व्यवस्थापन व प्रशांत खोपटीकर यांनी नियामक मंडळासंदर्भातील माहिती, गुंतवणुक संदर्भातील तरतुदी व अधिनियम या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार भारतीचे प्रदेश सहसंघटक प्रमुख विजयराव देशमुख यांनी केले. सुत्रसंचालन जिल्हा संघटनमंत्री निलेश लाखकर यांनी केले तर आभार जिल्हा उपाध्यक्ष सतीश सोमाणी यांनी मानले.

# अवैध वाळू वाहतुकीमुळे भैरवनाथ रस्त्याची दुरावस्था



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

चाफनाथ येथील भैरवनाथ मंदिर रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू वाहतुकीची वाहने जात असल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झाली असून सदरील वाहतुक बंद करून गावकऱ्यांना न्याय देण्याची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कळमनुरी तालुक्यातील मौजे चाफनाथ ग्रामस्थांच्या वतीने आज जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की. भैरवनाथ मंदिराकडे जाणारा रस्त्या यावरून मोठ्या प्रमाणात अवैध रेती वाहतूक होत असल्याकारणाने गावातील रस्त्याची दुरावस्था झाली आहे.

त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी वैयक्तिक अवैद्य होत असलेल्या रेती वाहतुकीकडे लक्ष देण्यात यावे. अशी मागणी चाफनाथ येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर पंडित श्रीराम, अश्विन किशनराव, सदाशिवराव चौतमाल, शंकर मोरे, रामचंद्र बेलखेडे, लक्ष्मणराव मस्के, बाळासाहेब वैद्य, रामचंद्र रूस्तुमराव, देवराव माधवराव, चंद्रमुनी बलखंडे, माधवराव धोंडबाराव चौतमाल, अनिल बलखंडे, अशोक दांडेकर, पांडूरंग वानखेडे, चंद्रकांत चौतमाल, दत्तराव माधवराव यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत. रात्रीला अवैध रेती वाहतूक होत असल्यामुळे गावकरी परेशान झाले आहेत. अवैध रेती वाहतुकीवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अन्यथा चाफनाथ ग्रामस्थांकडून आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.



**हिंगोली- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात रामदास पाटील यांनी नुकताच प्रवेश केल्यानंतर वसमत येथे राष्ट्रवादीची संघटनात्मक बैठक घेण्यात आली. यावेळी रामदास पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आ. राजू नवघरे, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया- विजय गुंडेकर**

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त शाळेत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याविषयी आपल्या भाषणांच्या माध्यमातून मनोगत व्यक्त केले. सौ. प्रीती स्वामी यांनी आपल्या भाषणातून नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, शाळेचे प्रशासक मारुती मेखाले व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडेराव जोगदंड यांनी केले तसेच कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त

### वकील संघाच्या जिल्हाध्यक्षपदी सुनील भुक्तर



हिंगोली- हिंगोली जिल्हा वकील संघाची अध्यक्षपदाकरिता निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली त्या निवडणूक प्रक्रियेचे मुख्य निवडणूक अधिकारी ॲड बी एल बांगर आणि सह निवडणूक अधिकारी बी.एस इंगळे, एस डी चौतमल होत. निवडणुकीमध्ये एकूण ३३० मतदान झाले. दोन मते बाद झाली. त्यापैकी ॲड आर यु जोशी यांना एकूण ७२ मते मिळाली तर ॲड सुनील राजकुमार भुक्तार यांना एकूण २५६ मते मिळाली. यावेळी ॲड गणेशराव ढाले, ॲड अशोकराव सावंत, ॲड रवींद्र सोनी, ॲड आर आर निळकंठे, ॲड पी के पुरी, ॲड एस के सिरसाठ, ॲड मनीष साकळे, ॲड पंजाबराव चव्हाण, ॲड सुनील गावंडे, ॲड सुभाष वाघमारे, ॲड धम्मदीपक खंडारे, ॲड सीताराम राठोड ॲड अखिल अहेमद, ॲड एस एस वाबळे, ॲड महेश अहेर, ॲड कैलास कोटकर यांच्यासह वकिल संघातील सर्व वकील सदस्य उपस्थित होते.

### आज आदर्शमध्ये दुग्ध शास्त्र विभागाचे सेमिनार

हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (झच् णडक) पुरस्कृत दुग्धशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २५ जानेवारी २०२५ रोज शनिवारला सस्टेनेबल डेअरी डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन करण्यात येणार आहे. सदरील सेमिनारला अध्यक्ष म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री कमलकिशोरजी काबरा हे उपस्थित राहणार आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्रमनी हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख बीजभाषक जबलपूर येथील जवाहरलाल नेहरू कृषी विश्वविद्यालयातील शास्त्रज्ञ डॉ. आर. एस. ठाकूर आहेत. तसेच प्रमुख वक्ते म्हणून विवेकानंद महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. व्ही. व्ही. निरस, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथील डॉ. एस. एन. लांडगे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या एकदिवसीय राष्ट्रीय सेमिनार मध्ये बुक स्टॉल, भिती पत्रकाचे प्रकाशन, पेपर वाचनातून गुरु-शिष्यांचा संवाद, शास्त्रज्ञांचे मत मतांतरे आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

# वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे २६,२७ जानेवारीला गडचिरोलीत अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन दि. २६ व २७ जानेवारी रोजी संस्कृती सांस्कृतिक हॉल गडचिरोली येथे होत आहे, अशी माहिती राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाटणकर यंनी दिली.

पाटणकर यांनी सांगितले की, दि. २७ जानेवारी रोजी सोमवारी सकाळी ११ वाजता संस्कृती संस्कृती सभागृह अमरोली रोड गडचिरोली येथे अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन लॉयड्स मेटल्स स्टील प्लांट कोनसरी कंपनीचे रेसिडेशिअल डायरेक्टर कर्नल विक्रम मेहता यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी खनिकर्म व शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर हे आहेत.ठाण्याचे आमदार संजय केळकर, गडचिरोली चिमूरचे खासदार नामदेव किरसान, गडचिरोलीचे आमदार मिलिंद नरोटे, अहेरीचे आमदार धर्मरावबाबा आत्राम, आरमोरीचे आमदार रामदास मसराम, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, गडचिरोली जिल्हा परिपदेचे माजी उपाध्यक्ष मनोहर पौरेटी,माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार कृष्णाजी गजबे, पोलीसअधीक्षक निलोत्पल, जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार सल्लागार शिवगोंड खोत,चामोर्शी बाजार समितीचे अध्यक्ष अतुल गण्यारपवार, गडचिरोली नगराध्यक्ष सुरेश पोरेल्ठीवार,गडचिरोली नगरपालिकेचे माजी सभापती विजय गोरडवार, दिनेश उक्के, विनोद पत्रासे आदींची उपस्थिती राहणार आहे. विक्रेत्यांनी या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई, सचिव हरीश कीर्तीवार यांनी केले आहे.

# शांताबाई दराडे विद्यालयाच्या दोन प्रयोगाची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात घवघवीत यश संपादन करून राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पात्र ठरले आहेत. शैक्षणिक साहित्य माध्यमिक गटातून या शाळेने हिंगोली जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. गणित अध्यापक राजकुमार बांगर यांनी तयार केलेले 'मॅथ्स वर्किंग मॉडेल' प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहे. या शैक्षणिक साधनाच्या साहाय्याने भूमिती मधील वर्तुळाच्या त्रिज्या, व्यास, जीवा, स्पर्शिका, छदिका, चक्रीय चौकोन, आंतर लिखित कोन, आंतर खंडित कंस, केंद्रीय कोन, इत्यादी संबोध सुलभपणे समजाऊन सांगता येतात. तसेच हे साधन अल्प खर्चिक व हाताळण्यास सुलभ आहे. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक श्री. गजानन बांगर यांच्या 'गृह सुरक्षा' या प्रयोगाला प्रयोगशाळा सहाय्यक गटातून जिल्ह्यातून प्रथम क्रमांक घोषित झाला आहे. या प्रयोगात रडार सेन्सर वापरून गृह सुरक्षा करण्याचे नवीन तंत्र विकसित केले आहे. अतिशय अल्प खर्च व समाजोपयोगीता हे या साधना चे वैशिष्ट्य आहे. या प्रयोगा करीता ज्येष्ठ विज्ञान अध्यापक भारत शिंदे व दत्तराज डोईफोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

याबद्दल यशस्वी शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांचे मुख्याध्यापक डॉ.प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसी चिलमूल यांनी सत्कार केले. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी यशस्वी शिक्षकाचे व प्रयोगशाळा सहाय्यक यांचे अभिनंदन केले व राज्य स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.

# कृषी पर्यवेक्षकाची हत्या करणाऱ्याला अटक करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जानेवारी**

आखाडा बाळापूर येथील कृषी पर्यवेक्षक राजेश शिवाजीराव कोल्हाळ हे कृषी कार्यालयात कर्तव्यावर असतांना त्यांची १० महिन्यापूर्वी निधृण हत्या करण्यात आली. अद्याप आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनाकडून आरोपीस अटक करण्यात दिरंगाई होत असल्याचा आरोप कोल्हाळ यांच्या पत्नीने केला आहे. शुक्रवारी जिल्हाधिकारी यांना सागर राजेश कोल्हाळ यांनी निवेदन सादर करीत दोन दिवसात आरोपीला अटक करावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि २६ जानेवारीपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

## थोडक्यात

### श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात बहरली आनंद नगरी



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ जानेवारी**

प्रत्येक विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शुक्रवार दि.२४ रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग दर्शवून आनंद घेतला.

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शुक्रवार दि.२४ रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप तर प्रमुख पाहुणे म्हणून बागपिंपळगाव व बेलगाव सेवा सोसायटी चेअरमन जनार्धन आप्पा चितळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते, मधुभाऊ मुगूटराव, अभिमन्यू ठोंबरे, गणेश मुगूटराव आदींची प्रमुख उपस्थिती होती. या स्टॉलचे उद्घाटन गावचे सरपंच रामेश्वर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी तसेच मुलांचे मनोरंजन व्हावे तसेच त्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने सदरील आनंद नगरीचे आयोजन मोठ्या थाटामाटात करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, सहशिक्षक भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरीभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी सहकार्य केले.

### परळी नगरपरिषदची क्रीडा क्षेत्रात झेप विभागात द्वितीय!



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ जानेवारी**

राज्य प्रशासनाच्या वतीने प्रत्येक वर्षी प्रशासकीय कर्मचारी यांना एक प्रोत्साहन म्हणून कर्मचारी खेळाडूंना शोधण्याचा प्रयत्न केला जातो आणि क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात याचाच भाग म्हणून बीड जिल्हा प्रशासन मार्फत बीड येथील जिल्हा क्रीडांगण जिल्हाधिकारी येथे कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या या मध्ये परळी नगर परिषदने प्रथम क्रमांक पटकावला होता सर्व युवा कर्मचारी खेळाडुन सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले होते नंतर पुढील स्पर्धे करिता संभाजी नगर विभागीय स्तरावर सुद्धा दुसरा क्रमांक पटकावला असून विभागात द्वितीय बक्षीस देण्यात आले आहे या युवा कर्मचारी खेळाडूंनी परळी नगर परिषदला विभागात द्वितीय बक्षीस मिळवून दिल्या बद्दल नगर परिषदचे मुख्याधिकारी कांबळे साहेब यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे सर्व खेळाडूंना पुढे भविष्यात ही असेच प्रोत्साहन देत रहाणार असे म्हंटले आहे तर या कबड्डी स्पर्धेत युवा कर्मचारी खेळाडू म्हणून समाधान समुद्रे ,शरणम ताटे,दशरथ जगतकर ,विजय कांबळे प्रकाश क्षीरसागर ,राहुल वैध्य कीर्तिमहान जोगदंड ,निखिल वाघमारे ,संघानंद कांबळे ,सतीश गोखले आदी होते तर यांना मार्गदर्शन नगर परिषदचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांनी केले आहे.

### अवकाशातील ग्रहांचे दुर्मिळ आविष्कार पाहण्याची सुवर्णसंधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

स्वा. सावरकर महाविद्यालया तर्फे यावर्षी ही अवकाशातील ग्रहांचे दुर्मिळ आविष्कार दुर्बिणी द्वारे पाहण्याचे आयोजन केले असून २५ जानेवारी २०२५ रोजी अवकाशा मध्ये साधारण चार लाख वर्षानंतर आपल्या सूर्यमालेतील एकूण आठ ग्रह सूर्याच्या समोर एका रेषेत येणार असून यास प्लॅनेटरी परेड म्हणून ओळखले जाते २५ तारखेस सूर्यास्ता नंतर यातील काही ग्रह दिसू लागतील बुध, शुक्र, बृहस्पति,मंगळ व शनी हे ग्रह कांहीं प्रमाणात उघड्या डोळ्यांनी पाहता येतील तर दुर्बीणद्वारे ते अधिक स्पष्ट दिसतील. यातील अरुण वरूण (युरेनस नेपच्यून) हे केवळ दुर्बिणी द्वारे दिसू शकतील ग्रहांची दिशा पाहण्यासाठी स्कायम्यापचा उपयोग करता येऊ शकतो भूगोल विभागातील अवकाशी दुर्बिण व बीड मधील खगोल अभ्यासक श्री विकास मिटकर हे त्यांच्याकडे असलेल्या अवकाशीय दुर्बिणीच्या साह्याने अशा दोन दुर्बिणीच्या आधारे स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये सायंकाळी सात ते साडेनऊ या कालावधी दरम्यान ग्रहांचे सरेखन पाहता येईल भूगोल विभागातील विभाग प्रमुख डॉ.अशोक डोके व डॉ. गायकवाड जोगेंद्र यांनी या उपक्रमाचे आयोजन केले असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे तसेच उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर व डॉ.उत्तम साळवे यांनी या दुर्मिळ ग्रहांचे अविष्कार पाहण्याचे आवाहन केले आहे

## बीड शहरातील सिग्नल बंद



बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर नाका, बसस्थानक परिसर या भागातील सिग्नल बंद असल्यामुळे वाहतूकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे सिग्नलचे काम तातडीने करावे अशी मागणी वाहन धारक व जनतेतून होत आहे. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)







# नानाजी देशमुख विद्यामंदिर बीड येथे हस्ताक्षर स्पर्धा संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

आधुनिक संगणकाच्या युगात हस्ताक्षर व लेखन कला संपुष्टात येते की काय ? शाळेत वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या त्यामुळे वेळेची सबब,धावपळीच्या कारणामुळे पालकांचे दुर्लक्ष व दोघांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांचा हस्तक्षराकडे पाहण्याचा उदासीन दृष्टिकोन यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर खराब होत चालले आहे.

यासाठीच बीड शहरात सुरेख हस्ताक्षर वर्गाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षरात सुधारणा झाल्यामुळे त्याचा त्यांना फायदा होत आहे.

हस्ताक्षराची जागृती होण्यासाठी जागतिक हस्ताक्षर दिनाच्या निमित्ताने बीड शहरातील नावाजलेले सुरेख हस्ताक्षर वर्ग व नानाजी देशमुख विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी सुरेख हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी इयत्ता पाचवी ते सातवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

त्यापैकी देवयानी कदम ७वी प्रथम,सोहम संतोष हावळे ५ वी द्वितीय,ओमकार काळे ७ वी तृतीय तर उत्तेजनार्थ मध्ये वैभवी बडे ७ वी, राजवी जाधव ७ वी,संपदा चोले ६वी गौरी शिंदे यांचे क्रमांक आले. शालेय विभागप्रमुख सुनंदा ताई कुलकर्णी, अ‍ॅड.अर्चनाताई तुंगार यांनी परीक्षण केले.वरील मान्यवराबरोबरच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अर्चना मोराळे,सर्व स्टाफ,व सुरेख हस्ताक्षर वर्गाचे प्रमुख सुदाम पालकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# गोष्ट एका टेकडीची बालनाट्याचे राज्य नाट्य स्पर्धेत प्रभावी सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत सुंदरेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गुंज(बु) संचालित आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टस् प्रस्तुत गोष्ट एका टेकडीची हे बालनाट्य छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्य मंदिरात सादर करण्यात आले. हरिदास घुंगासे लिखित हे नाटक लहान मुलांमध्ये पर्यावरणाची जागरूकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवून तयार करण्यात आले आहे.नाटकात टेकड्या आणि डोंगर यांचे महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनाची गरज या विषयावर भर देण्यात आला आहे.

मुलांच्या मनोरंजनासोबतच त्यांना पर्यावरणाच्या संरक्षणाची जबाबदारीही समजावून सांगण्याचा प्रयत्न या नाट्यातून करण्यात आला आहे.जालना जिल्हा घनसावंगी तालुक्यातील गुंज(बु),पिंपळगाव(कु) आणि परिसरातील कलावंत हरिदास घुंगासे संचलित आयुष कला अकॅडमीचे मार्गदर्शक प्रख्यात सिने-नाट्य अभिनेता,लेखक ,दिग्दर्शकप्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाट्य स्पर्धेत सहभागी होत असून सांस्कृतिक चळवळ गतिमान करीत आहेत.रंगकर्मी हरिदास घुंगासे,रघुनाथ ताठे यांनी नाट्यनिर्मिती केली असून, प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे ,हरिदास घुंगासे यांनी दिग्दर्शन केले आहे. अमृता देवकर, तन्वी सोळंके, गौरव डहाळे, विराज दायमा, दर्शना डोईफोडे, ईश्वरी ताठे, कार्तिक बहिरे, आयुष घुंगासे, दत्ता व्यवहारे या बाल कलावंतांनी या नाटकात आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे.

गोष्ट एका टेकडीची' या बालनाट्याचा प्रयोग किसन भोईटे, महेंद्र वाहुळे (नेपथ्य), नंदू वाघमारे (प्रकाश योजना), सार्थक लासे आणि पवन दशरथ (संगीत) तसेच सीमा ताठे आणि मनीषा घुंगासे (रंगभूषा/वेशभूषा) यांच्या उत्कृष्ट तांत्रिक सहकार्यामुळे प्रभावी झाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत २१ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार येथे २० आणि २१ जानेवारी २०२५ दरम्यान सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे तसेच सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. स्पर्धेमध्ये एकूण १० संघांनी सहभाग घेतला. छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातील इतरही संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. केंद्रसमन्वयक म्हणून रूपेशकुमार परत वाघ,करण लुंगाडे जैन व सह समन्वयक अनिल मोरे यांनी उत्कृष्ट आयोजन केले.

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात पथनाट्य स्पर्धा, जीवनउत्सव, पुस्तकांवरील चर्चासत्र व मुशायऱ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ जानेवारी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या वतीने जागर लोकशाहीचा आपणा सर्वांचा या उपक्रमांतर्गत नागापूरकर सभागृहा समोर जीवन उत्सव, पुस्तकावरील चर्चासत्र, पथनाट्य स्पर्धेचे व राष्ट्रीय एकात्मतेवर मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे व मुशायऱ्याचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले तर चर्चासत्राचे उद्‌घाटन सचिव कमलाकर चौसाळकर यांनी केले.

## जागर लोकशाहीचा आपल्या सर्वांचा

लोकशाही, प्रसार माध्यम व बालविवाह विषयावर पथनाट्य स्पर्धा

या पथनाट्य स्पर्धेत शहरातील अनेक संघांनी सहभाग घेतला होता. पथनाट्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून बाळासाहेब देशपांडे मुकद्दम व बिपिन घोबाळे यांनी काम केले.या प्रसंगी बर्दापूरकर मॅडम यांनी पथनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या तीनही संघांना प्रत्येकी अकराशे रुपयांचे प्रोत्साहनपर पारितोषिके जाहीर केली . बाल- विवाहाचे दुष्परिणाम माध्यमांची एकांगी भूमिका, भारतीय संविधानाचे महत्व इ. विषयांवर पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात आले.

पुस्तकावरील चर्चासत्र

महात्मा गांधी वाचन कट्ट्यामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पुस्तकावरील चर्चासत्रात सहभाग नोंदवला. कुमारी ऋतुजा शिंदे हिने राजगृहाची सावली, कुमारी मोनिका मिसाळ या विद्यार्थिनीने क्रांतिकारी तरुणांनो, संकेत पवार यांनी शिवाजी कोण होता, सारंग भगत यांनी भटक्याचे लग्न, आदित्य कासारे यांनी अस्मितांचे अंतरंग, अश्विनी तिडके यांनी बखर शिक्षणाची, अविष्कार जंगले यांनी गांधी व गैरसमज, प्रथमेश उपाडे यांनी माणूस जेव्हा जागा होतो, नेहा बोंडगे यांनी शिवाजी जन्माला आले नसते तर, कृष्णा मस्के यांनी द प्रिन्स या पुस्तकावरील परीक्षणाचे सादरीकरण केले.

जीवन उत्सव

जीवन उत्सव या अंतर्गत वेगवेगळ्या जीवनावश्यक वस्तूंचे, खाद्य पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले. श्री भागवत देवकुळे धारूर यांनी स्वतः बनवलेल्या चप्पल व बुटांचे प्रदर्शन व विक्री केले. माजी विद्यार्थी श्री बाबजी यांनी इडलीचा स्टॉल लावला. अनुराग पुस्तकालय मार्फत पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली.

राष्ट्रीय एकात्मता मुशायरा

राष्ट्रीय एकात्मतेवरील मुशायऱ्यामध्ये विद्यार्थ्यांनी हिरिरीने सहभाग घेतला . यामध्ये शेख अलमास, सय्यद रेहान, फरहान शेख यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी कांहीं शेर सादर केले. डॉ. वहिदा पठाण मॅडम व उर्दू विभागातील प्राध्यापकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला . जीवन उत्सव, विद्यार्थी चर्चा सत्राचे व इतर कार्यक्रमाचे आयोजन जागर लोकशाहीचा या कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. शैलजा बरुरे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. पथनाट्य स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलजा बरुरे यांनी केले .या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर यांनी केला. सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कृष्णा मस्के यांनी केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. एन. के. गोळेगावकर, सौ.बर्दापूरकर मॅडम निलिमाताई खुरसाळे, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# बबन थोरातांच्या घराचा टॅक्स शिवसैनिकांच्या खिशातुन

## पक्षाच्या नावाखाली थोरात दलाली करत असल्याचा युवा सेनेचे समन्वयक योगेश नंदनवनकर यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ जानेवारी**

पक्षाच्या नावाखाली शिवसेना (उबाठा) बबन थोरात यांनी उमेदवारी, पदाधिकारी निवडी, वरिष्ठ नेत्यांच्या सभा घेण्यासाठी दलाली करत लाखो रुपये घेतले तसेच त्यांच्या पुणे येथील घराचा टॅक्स देखील भरला असल्याचे युवा सेनेचे समन्वयक योगेश नंदनवनकर यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले.



शिवसेना (उबाठा) संपर्क प्रमुख बबन थोरात यांनी केवळ नांदेडमध्येच नव्हे तर राज्यातील अनेक जिल्ह्यात असे प्रकार केले आहेत. निवडणुकीमध्ये पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांची सभा घेण्यासाठी ५ लाख रुपये घेतले. पदाधिकारी निवडीसाठी १० लाख तर नांदेड उत्तर मतदारसंघात उमेदवारी देण्यासाठी लाखो रुपये घेतल्याचा आरोप योगेश नंदनवनकर यांनी केला. पक्षातुन हकालपट्टी करण्याची दमकी देत पैसे उकळायचे आणि नंतर विरोधकांना मॅनेज व्हायचे असा प्रकार बबन थोरात करत आहेत. त्यांच्या या प्रकारामुळे निष्ठावान शिवसैनिक नाराजी व्यक्त करत असून त्यांच्या त्रासाला कंटाळले आहेत. बेस्टचे कर्मचारी असलेले बबन थोरात यांच्याकडे करोडोंची संपत्ती असून, या संपत्तीची इडी मार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. तर बबन थोरात यांच्या या कारभाराविषयी शिवसेना नेते संजय राऊत यांची भेट घेण्यात आली. त्यांच्याकडे देखील बबन थोरात यांच्या पुणे येथील घराचा टॅक्स भरल्याचे पुरावे देण्यात आले असल्याचे युवा सेना समन्वयक योगेश नंदनवनकर यांनी सांगितले.

# विकासाठी कोणाशीही दुश्मणी घेण्यास तयार : आ. पवार

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २४ जानेवारी**

गेल्या पंचवार्षिक मध्ये मी आमदार म्हणून काम केले नाही तर जनतेचा सेवक म्हणून विकास कामावर भर दिल्याने जनता दुसऱ्यांदा कामाचा आमदार म्हणून निवडून दिले असून त्या जनतेच्या विश्वासाला पात्र राहून येणारे पाच वर्षात विकासाचा दुसरा टप्पा म्हणून उमरी तालुक्यातील सार्वजनिक विकास कामे वेगाने करण्यास कटीबद्ध असून जनतेच्या विकासासाठी अधिकारी कुचराई केल्यास कोणत्याही अधिकारी कर्मचारी व इतर राजकीय लोकासाठी दुश्मणी घेण्यास तयार आहे असे ही आमदार राजेश पवार यांनी उमरी येथिल जनता दरबारात खुले आम बोलून जनतेचा सेवक असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे .

- उमरी तालुक्यात जनता दरबार दि २४ जानेवारी रोजी घेण्यात आले होते. यावेळी धर्माबाद उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे , तहसीलदार प्रशांत थोरात , मुख्यधिकारी डॉ निलम कांबळे , गटविकास




अधिकारी विश्वनाथ अरबटवार , पो.नि अंकुश माने , राहुलवार , जुगल जाधव , गोडगावे अभियंता भोकर , संजीव सवई आदी उपस्थित होते.यावेळी ग्रामसेवक वनसागरे , कोंडामंगल यांनी संघटनेच्या वतिने आ. राजेश पवार यांचे स्वागत करण्यात आले. तसेच संविधान अमृत महोत्सव निम्मीत नगरपरिषदे कडून संविधान प्रस्तीवीक देण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांनी आमदार पवार यांच्या आदेशानुसार शासकीय मुख्यमंत्री १०० दिवस यांचा ७ कलमी क्रुती आराखडा कार्यक्रम उजाळणी केली. वेबसाईट अध्यावत माहिती प्रसिद्धी करणे , सर्वसामान्य जिवनमन किमान दोन सेवा १०० दिवसात पुर्ण करणे , स्वच्छता सोयीचे निर्देश , तक्रार निर्वाण जलदगतीने होण्यासाठी नोडल अधिकारी नेमणूक , सरकारी कार्यालयात जनतेसाठी सोयी सुविधा अहवाल फलक दर्शविणे , गुंतवणूकीत प्रोत्सान देणे , शेतकरी जमिन क्षेत्र पादंन रस्ते , स्मशानभुमीचा एक गाव एक स्माशानभुमीचा अभियान संकल्पनुसार महसुल खाते विडा उचला असल्याचा उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांनी माहिती दिली.

आमदार राजेश पवार यांनी उमरी तालुक्यातील पांदन रस्ते , स्मशानभुमी , पाणीपुरवठा , मनेरेगा ,विद्यूत पुरवठा समस्या , घरकुल संबंधीत तक्रार जनतेच्या जानून घेवून घेतल्या विशेषता उमरी तालुक्यात आमदार राजेश पवार यांच्या पुढे तक्रारीचा पाऊस पडला पण संबंधीत अधिकारी कर्मचारी यांची गय न करता आ . राजेश पवार अनेकाना खडसावीत जनता दरबारात अनेक प्रश्न मार्गी लावले तर संबंधीत तक्रारदार यांचे प्रश्न किती दिवसात मार्गी लावता , प्रलंबितयांचे कारण काय ? दुसऱ्या टप्यात विकास कामात निष्काळजी करण्याची गय केली जाणार नाही असा सज्जड दम दिला. त्यामुळे जनता दरबारात अनेकांना न्याय मिळाल्याने उमरी तालुक्यातील जनता आमदार राजेश पवार यांच्यावर खुश दिसुन आली आहे . दुपारी १२ ते ५:३० वाजेपर्यंत आमदार संबंधीत प्रत्येक विभागाचे अधिकारी उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ग्रामसेवक वनसागरे, अनिल कांबळे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त




### युनिव्हर्सल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचा दबदबा कायम

**मुदखेड**-अबैकस व वेदिक मैथ जिल्हा लेवल परीक्षा २०२५ कैबरिज माध्यमिक विद्यालय शिवाजी नगर नांदेड येथे संपन्न झाली व मुदखेड येथील युनिव्हर्सल पब्लिक स्कूल या शाळेतील जिल्ह्यातील २० शाळेतील विद्यार्थ्या मध्ये प्रावीण्य प्राप्त केले युनिव्हर्सल च्या विद्यार्थ्याचा दबदबा याहि वर्षी कायम ठेवला आहे शाळेचे ११ विद्यार्थी जिल्हा लेवल मध्ये विषेश प्रावीण्य प्राप्त झाले व नॅशनल लेवल साठी ७ विद्यार्थी सिलेक्ट झाले या कैम्पीटिशन मध्ये विद्यार्थ्यांनी २.२३ दोन मिनट तेविस शेकंदात मुलांनी ५० गणित सोडवले आहे या मध्ये शाळेच्या प्राचार्या सौ. हाळदे मैडम यांचे नियोजन उप प्राचार्य वर्षा चन्द्रे मैडम, बालाजी कुसुमवाड, विद्या गायकवाड, शिल्पा जाधव, नंदिनी जाधव, पुष्पा भालेराव, अंकुश बट्टेवाड, दराडे सर, ज्योती दर्शनवाड या सर्व शिक्षकांच्या मेहनती मुळे जिल्ह्यातुन सर्वात जास्त विद्यार्थी रैक होल्डर झाले आहेत स्टार ज्युनियर,लेवल-१.२.३ व वेदिक मैथ मध्ये सर्वात जास्त विद्यार्थी युनिव्हर्सल शाळेचे विद्यार्थी चमकले आहेत. मुदखेड तालुक्यातील सर्व पालक या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा बद्दल समाधानी झाले आहेत. या कार्यक्रमाला नांदेड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी, बनसोडे अध्यक्ष स्थानी होते व महाराष्ट्र ईंग्लिश राज्य संघटना जिल्हा अध्यक्ष शिवाजी उमाटे, जिल्हा सचिव राजीव घोडके, व जितेंद्र सिंह पाहडिया व विश्वम एज्युकेशन जोनल सि. ई. ओ. नाईक सर व त्यांची टिम यांच्या प्रमुख उपस्थितीत होती अध्यक्षांनी आपल्या भाषणात अबैकस व वेदिक मैथ कैम्पिटिशन साठी अचुक पद्धत विद्यार्थ्याना अवगत होते त्यामुळे विद्यार्थ्यांना अबैकस वेदिक मैथ साठी आई वडिलांनी अशा प्रतियोग्य मध्ये भाग घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले आज युनिव्हर्सल च्या ८५ विद्यार्थ्यानी भाग घेतला होता. यावेळी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्व पालकांनी समाधान व्यक्त केले.

### निवघा येथे आज मोफत सर्व रोगनिदान व उपचार शिबीर

**निवघा बा**-आमदार बाबुराव कदम यांनी हिंदूहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे दि. २५ जानेवारी रोजी शनिवारी गंगाराम पाटील हायस्कूल निवघा (बा.) ता. हदगाव जि. नांदेड येथे आयोजित केले आहे. महिलांच्या ब्रेस्ट कॅन्सरची तपासणी केली जाईल व सर्व प्रकारचे आजार निदान व उपचार करण्यात येतील. आमदार बाबुराव कदम यांच्या वतीने आयोजित केलेल्या या शिबिराचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांनी केले आहे. याशिवाय भरती झालेल्या रुग्णांना हॉस्पिटलमध्ये जाण्यसाठी वाहनांची मोफत व्यवस्था करण्यात येईल. शिबिरामध्ये येताना रुग्णांनी आधार कार्ड व रेशन कार्ड सोबत आणावे. शिबिराची सवलत ही १ महिन्यासाठी राहील. या शिबिरामध्ये दत्ता मेघे रुग्णालयाचे कौटुंबिक आरोग्य कार्ड केवळ ३०० रुपयांत काढण्यात येईल.

### किशोर जगत यांना मातृशोक

**माहूर**-शहरातील प्रतिष्ठित नागरिक तथा आमदार भीमराव केराम यांचे निकटवर्तीय किशोर वसंतराव जगत यांच्या मातोश्री रेखाताई वसंतराव



जगत यांचे अल्पशा आजाराने बुधवार दिनांक २२ जानेवरी रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्षाचे होते. त्यांचे पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. गुरुवार दिनांक २३ रोजी दुपारी १२ वाजता मातृतीर्थ तलावाजवळील हिंदू स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या निधनाबद्दल किनवट-माहूर मतदारसंघाचे आमदार भिमराव केराम, विश्वस्त चंद्रकांत भोपी,संजय कान्नव, नंदकुमार संतान, विजय आमले, नंदकुमार जोशी, वसंत कपाटे, बजरंगसिंह हजारी,नामदेवराव केशवे,राजेंद्र केशवे, बाबाराव केशवे,अनिल वाघमारे, गोपु महामुने, समाधान जाधव, ज्योतिबा खराटे, विलास भंडारे यांचेसह अनेकांनी शोक व्यक्त केला.


### नत्थूजी कलाने यांचे निधन

**माहूर**- येथील श्री जगदंबा विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक नत्थूजी कलाने



वय ८५ वर्षं यांचे दि. २२ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पार्थिवावर सायंकाळी ५ वा. भोजंती तलाव जवळील स्मशानभूमीत अनेकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.सेवानिवृत्त शिक्षक स्व.नत्थूजी कलाने हे गणित विषयतज्ञ म्हणून ओळखले जात. त्यांचे पश्चात पत्नी,४ मुलं, सुना, नातवंडं असा मोठा आप्त परिवार आहे.

### दूलेखां पठाण यांचे निधन



**माहूर**-येथील हॉटेल व्यावसायिक दुलेखां कासमखां पठाण वय ७५ वर्षे यांचे दि.२३ जानेवारी रोजी दुपारी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिकपणे निधन झाले. त्यांचे पश्चात पाच मुले, तीन मुली, पत्नी, नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. २४ रोजी त्यांचे पार्थिवावर सोनापिर दर्गा रोड लगतच्या

# शांतीवर्धक हायस्कूल कुन्मारपल्ली शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २४ जानेवारी**

तालुक्यातील हनेगाव परिसरातील कुन्मारपल्लीयेथे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थी 'स्वयंशासन' दिन साजरा करण्यात आला. स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने शाळेतील इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थीनी कुमारी शुभांगी गनिमे यांनी छात्रमुख्याध्यापिका म्हणून काम पाहिले. तसेच शाळेतील एकूण २५ विद्यार्थ्यांनी छात्रशिक्षक व छात्रशिक्षकेतर कर्मचारी म्हणून काम पाहिले. उत्तम नियोजन करून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे शाळेचे मुख्याध्यापक श्री. अणदुरे एन. एम. यांनी अभिनंदन केले. अशाप्रकारे हा कार्यक्रम अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला.

# काकांडी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २४ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त सुदिन संभाजी पाटील बागल व समस्त गावकरी मंडळी काकांडी यांच्या वतीने दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ३ दरम्यान काकांडी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी ९ ते ६ या वेळात भव्य रक्तदान शिबिरास प्रारंभ होईल. सतत ६ वर्षापासून चालत आलेल्या या भव्य रक्तदान शिबिरास प्रमुख उपस्थिती म्हणून आ. हेमंत पाटील, आ. आनंद बोंढारकर, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांची उपस्थिती राहणार आहे. शिबिराचे उद्घाटन गतवर्षीच्या रक्तदात्या महिला यांच्या हस्ते होणार आहे. रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजक सुदिन बागल यांनी केले आहे.

# रास्तभाव धान्य दुकानदारांचा आज जिल्हा मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ जानेवारी**

नांदेड जिल्हा रास्तभाव धान्य दुकानदार संघटनेचा २५ जानेवारी रोजी वासवी माता कन्यका परमेश्वरी भवन, सिडको रोड येथे जिल्हा मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह जिल्हयातील सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे.

शनिवारी दुपारी ४.०० वा. होणाऱ्या या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी खा. अशोकराव चव्हाण यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ. अजित गोपछडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यात राज्यातील रास्तभाव धान्य दुकानदार परवाना धारकास ३०० रु. प्रति क्वि, कमिशन मार्जिन मंजूर करण्यात यावी, जिल्हयातील १६ तालुक्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा इष्टांक केंद्र शासन तसेच राज्य शासनकडून मंजूर करावा तसेच गेल्या ३ वर्षांपासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत बंद असलेली डेटा एंट्री तात्काळ सुरु करावी, मयत रास्तभाव धान्य दुकानदारांना चारसा आधारे प्रथम ३ महिन्यात तात्पुरत्या स्वरुपात आणि त्यानंतर न्यायालयाच्या कार्यवाहीनंतर कायमस्वरुपी दुकान मंजूर करण्याबाबत शासन निर्णय असतांनाही ३० ऑगष्ट २०२१ पासून जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दुसऱ्या दुकानास पर्यायी व्यवस्थ। लावली जात आहे. अरो न करता त्वरीत वारसाआधारे कायमस्वरुपी दुकान मंजूर करावे या व इतर मागण्यावर वर्चा केली जाणार आहे. या मेळाव्यास जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड पोलिस परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, जिल्हा पोलिस अधिक्षक अबिनाशकुमार, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडवकर, जिल्हा पुरवठा अधिकारी रुपाली चौगुले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाल यांची विशेष निमंत्रित उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्यास जिल्हयातील सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक जयवंतराव एडके यांच्यासह सर्व जिल्हा, शहर, तालुका कार्यकारणी सदस्यांनी केले आहे.

# आरोग्य सुरक्षित राहण्यासाठी खेळ टिकले पाहिजेत : जवळगावकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २४ जानेवारी**

नांदेड जिल्ह्यात धार्मिक सामाजिक कार्यक्रमासह भक्तिमय वातावरणातील उत्सवाने सर्व परीचीत असलेल्या मौजे कवाना ता. हदगांव येथील श्री. संत नंदी महाराज यांच्या १०४ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. यात्रेनिमीत्य दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्य स्तरीय भजन, कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भजन स्पर्धेसह यात्रा कमिटी समस्त गावकरी मंडळीच्या सहकार्यातून उपसरपंच संदीप पवार कवानकर यांच्या आयोजनातुन कब्बडी स्पर्धे चे उदघाटन माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी आरोग्य सुरक्षित राहण्यासाठी मैदानी खेळाचे महत्व अनन्यसाधारण आहे, पुढील काळात मैदानी खेळ टिकले पाहिजेत तसेच खेळाडूही तयार करण्यासाठी प्रयत्नही करणे आवश्यकच असल्याचे



माजी आ. जवळगावकर यांनी सांगितले. यावेळी त्यांनी यात्रा कमिटी समितीच्या पुढाकाराबद्दल कौतुक व्यक्त करीत सर्वाच्या सहकार्यातून पुढील काळात तीर्थक्षेत्राचा दर्जा वाढवण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल असे सांगून यात्रेनिमीत्यची गर्दी लक्षात घेता मनाठा पोलीस प्रशासनाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीतुन केलेल्या कामाचे कौतुक केले, सूत्रसंचालन सादुलवार यांनी केले. यावेळी सपोनि उमाकांत पुणे, किशोर पाटील रूईकर, दिगांबर साखरे पिंपरखेडकर, डॉ. बि. के. निळे, सरपंच नंदाताई पाटोदे, सुभाषराव राठोड किन्हाळकर, ज्ञानेश्वर साखरे पिंपरखेड, पिंटु पाटील हट्टी नाईक पिंपरखेडकर, बालासाहेब पाटील, अनिल पवार, ओमप्रकाश येवले, बालासाहेब मस्के, शामराव पाटील मनाठकर, यांच्यासह परिसरातील आजी माजी सरपंच उपसरपंच उपस्थित होते. कब्बडी स्पर्धेत अनेक संघानी सहभाग घेतला होता. प्रथम क्रमांक बामणी तांडा दुसरे पाथरी जि. परभणी, तिसरे आमदरी ता. किनवट, चौथे वाखारी ता. हिंगोली तर यांनी पटकाविले. विजेते संघास बक्षीस व कै. तुकाराम चेपुरवार यांच्या स्मरणार्थ मारोतराव चेपुरवार यांच्याकडून व नेहरू युवा केंद्राकडून कुबेरराव राठोड किन्हाळकर व दिपकराव सुर्यवंशी यांच्याकडुन ट्राफी देण्यात आली.

# पुरवठा विभागातील एपिएल, डीबीटी शेतकरी शिधापत्रिका धारकांनी आर्थिक योजनेचा लाभ घ्यावा : परळीकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २४ जानेवारी**

तालुक्यातील एपिएल,डीबीटी शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती अनुदान जानेवारी २०२३ पासुन दरमहा १५० रुपये योजने अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाचा लाभ घ्या अशे तहसीलदार विठ्ठल परळीकर व पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार नागार्जुन खैरे यांनी अहवान केले आहे.

लोहा तालुक्यात पुरवठा विभागाच्या वतीने राशेन नियतन नियमित वितरीत केले जाते.या योजनेत शेतकरी शिधा पत्रिकाधारक लाभार्थ्यां योजनेचा लाभ दिला जातो. ज्या लाभ धारकांला जानेवारी २०२३ पर्यंत लाभ मिळाला नाही आशा वंचित लाभधारकांनी तहसिल कार्यालय पुरवठा विभागात शिधापत्रिकेची छायांकीत प्रत, सोबत कुटुंब प्रमुखाचे बँक खाते क्रमांक, कुटुंबातील सर्व सदस्यांच्या आधार कार्डची छायांकीत प्रत व ७/१२ उता-याची छायांकीत प्रत सोबत आपला अर्ज संबंधीत रासरास्तभावदुकानदारा मार्फत किव्हा स्वतः लोहा तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात त्वरीत सादर करावे, असे आवाहन तहसीलदार विठ्ठल परळीकर व पुरवठा अधिकारी नागार्जुन खैरे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण विभाग यांचे शासन निर्णयान्वये, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सामाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी रुपये १५० इतक्या रकमेच्या थेट हस्तांतरणाची योजना कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रतिवर्षी किमान आधारभुत किंमतीत होणा-या वाढिनूसार केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या तरतुदीनुसार प्रतिमाह प्रतिलाभार्थी सुधारित वाढिव रोख रककम (पुढिल दशकाच्या पूर्णांकात) थेट हस्तांतरीत करण्यात मान्यता देण्यात आली असल्याचे तहसील कार्यालयातील पुरवठा विभागा तर्फे सांगण्यात आले.यावेळी पुरवठा पेशकार दत्ता गायकवाड, चंद्रकांत गुद्दे, विक्रम गहोलोद,श्रीजीत चव्हाण , गयाबाई पार्डीकर यांची उपस्थिती होती.

# लोहा काँग्रेस तालुका अध्यक्षपदी मधुकर दिघे

**लोहा**-भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदी मधुकर पाटील दिघे कारेगावकर यांची निवड झाली या निवडीबद्दल शासकीय विश्रामगृह येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने शाल, पुष्पहार भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीनिवास मोरे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दत्ता पाटील दिघे, माजी नगरसेवक चंद्रकांत नळगे, माजी नगरसेवक शिवाजी अंबेकर, माजी नगरसेवक उत्तम महाबळे, माजी अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष व नगरपरिषद उपसभापती शरफोदीन शेख, दिगांबर मेकाले, दिगांबर पाटील किरवले,संदिप दिघे, शालेय समितीचे उपाध्यक्ष अंगद दिघे,गणेश किरवले, कैलास मोरे, नवनाथ दिघे, विलास दिघे, बंडू रमण यांची उपस्थित होती.

# भिमशक्ती सामाजीक संघटणेच्या उपोषणालो यश

**अनेक मागण्या मान्य !**

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव,दि. २४ जानेवारी**

भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने दि. २४ जानेवारी २०२५ रोजी पंचायत समिती देगलूर येथे बसण्यात आलेल्या आमरण उपोषणाच्या संदर्भात देगलूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांनी मागण्या मान्य केल्या आहेत. जिल्हा परिषद हायस्कूल हाणेगावच्या कंपाउंड वॉलसाठी १० लाख रुपये तसेच जिल्हा परिषदेच्या मैदानच्या दुरुस्तीसाठी १० लाख व अन्य मागण्या मान्य केले. देगलूर ते हणेगाव-शिळवणी ते हाणेगाव - मानूर ते हाणेगाव ते भूतनहिप्परगा, या रस्त्याच्या डांबरीकरणासाठीचे निवेदन कार्यकारी बांधकाम अभियंता यांच्याकडे पाठवण्यात आले. यामुळे गटविकास अधिकारी यांच्या विनंतीवरून भीमशक्तीने उपोषण मागे घेतले आहे. यावेळी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शत्रुघन वाघमारे, विवेक सावकार , पडकंठवार, योगेश देशमुख, हजूशेठ चमकुडे, संजीव सोनकांबळे, किशोर आडेकर शिळवणीचे सरपंच अनिल राठोड, माजी सरपंच पद्माकर देशमुख, भीमराव भुतणारे, नितेश सूर्यवंशी ,धनाजी होठले आदी उपस्थित होते.

# आ. केरामांनी घेतली ना.गडकरी यांची भेट; विविध मागण्यांना मिळाली हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट-माहूर,दि. २४ जानेवारी**

माहुर-किनवट-नादेड हा किनवट शहरात रखडलेला राष्ट्रीय महामार्ग १६१ (अ), तसेच मतदारसंघातील प्रस्तावित अन्य रस्त्यासाठी ,किनवट/ माहुर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली असून यावेळी त्यांनी राष्ट्रीय महामार्गाचे अनेक ठिकाणी अपुर्ण असलेले काम तात्काळ पूर्ण करावे, माहूर किनवट राष्ट्रीय महामार्गावरील सारखणी ते आदीलाबाद (तेलगंणा )या आंतरराज्य मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन निधी उपलब्ध करून द्यावा तसेच किनवट शहरा बाहेरुन बाह्य वळणरस्त्याचे काम तातडीने मार्गी लावण्याची मागणी यावेळी केली. या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत निधी उपलब्ध करून देण्याचे व प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आश्वासन गडकरी यांनी दिले आहे.



किनवट शहरातून जाणाऱ्या सरसम ते धनोडा या राष्ट्रीय महामार्ग क्र १६१ अ चे काम मागील सहा वर्षांपासून रखडून आहे.बहुतांश पुलांची कामे संथ गतीने सुरू आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे काम कधी पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे .त्यामुळे यासंदर्भात आमदार भीमराव केराम यांनी नागपूर येथे केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन राष्ट्रीय महामार्गाची एकंदर परिस्थिती त्यांच्या लक्षात आणून दिली.किनवट मतदार संघातील माहूर,सारखणी,उमरी ऊनकेश्वर मांडवी अंतरगाव अर्ली वडोरा, भीमपूर आदीलाबाद राज्य मार्ग ५१ हा राष्ट्रीय महामार्ग घोषित करून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. २०१७ साली माहूर येथील जाहीर सभेत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग करण्याचे आश्वासन दिले होते सदरील रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून दर्जोन्नत झाल्यास किनवट माहुर विधान सभा मतदारसंघाच्या औद्योगिक दृष्टीने शेतमालाची बाजारपेठ म्हणून प्रगती होण्यास हातभार लागेल तसेच श्री रेणुकादेवी मंदिर माहूरगड येथे सद्यस्थितीत केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत प्रगतीत असलेल्या लिफ्ट विथ ओव्हर ब्रिजच्या कामामुळे भविष्यात मोठ्या संख्येने चंद्रपूर, गडचिरोली ,बल्लारशा तसेच तेलंगणा राज्यातून येणाऱ्या भाविकांना हा महत्त्वाचा व जलद रस्ता सोयीचा होणार असल्याची बाब त्यांनी चर्चे दरम्यान गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिली .तसेच किनवट बाह्य वळणरस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली. आ. केराम यांच्या मागण्याना गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत निधी उपलब्ध करून देण्यासह राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे.. आमदार भिमराव केराम यांनी किनवट शहरातील जनतेला आणि कामानिमित्त किनवट ला येणारया तालुक्यातील जनतेला रस्त्यामुळे होणारा त्रास लक्षात घेऊन , शहरासहीत पुढे ईसलापुर पर्यंत ठिकठिकाणी रखडलेल्या महामार्गामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहेत. ,त्या बाबत सविस्तर केंद्रीय मंत्रीची भेट घेतल्याने हा प्रश्न निकाली निघेल ,शहरातील रस्ता ऐंशी फुट तर रुंद व्हावे, तसेच शहराचा भविष्याचा विचार करून बाहय वळण रसता गरजेचा आहे. असे मत जनतेतून व्यक्त होत आहे. यावेळी अनु. जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे ,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, अमन कुंडगीर,गजानन मासटवार हे उपस्थित होते

## जाहिर प्रगटन

**नोंदीचा प्रकार**:खरेदी- माहिती मिळालेचा दि.१६/०१/२५ फेरफाराचा दि.१८/०१/२५

**लिहून देणार**:विजयकूमार बालाजी रा.भोकर(खाता क्रमांक ७२०) यांचे गट/सर्व्हे क्रमांक ४८८ लागवडी योग्य क्षेत्र ०.१२४१ हे.आर. चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९८हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

**लिहून घेणार**:सूरेखा संजय न्यालमवार क्रमांकः९८०८)गट/सर्व्हे क्रमांक ४८८ लागवडी क्षेत्र ०.००९८ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडिल खरेदी दस्त १२०१ दि.१३/०७/२००४ प्रमाणे रक्कम १२५००० घेऊन खरेदी दिली. सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२वर दाखल केले.

ज्याअर्थि तूमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदीवरुन मला वाटते आणि ज्याअर्थि उक्त फेरफारात तूमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदीसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे.ग्राम महसूल अधिकारी भोकर यांचेकडे उक्त पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे गृहित धरले जाईल कृपया याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तलाठी साझा भोकर**
**ता.भोकर जि.नांदेड**